
# महाराणी येसुबाई

अशोक बेंडखळे



## आभार

# महाराणी येसूबाई

या पुस्तकाचे सर्व हक्क **लेखक श्री. अशोक बेंडखळे** यांचेकडे आहेत.

“महाराणी येसूबाई” ची ही ई आवृत्ती आहे. ई साहित्यावर विनामूल्य करण्यात आली आहे. छापील प्रत लेखकांकडून विकत मिळू शकेल.

हे पुस्तक ई साहित्यवर विनामूल्य उपलब्ध करून दिल्याबद्दल आम्ही श्री. अशोक बेंडखळे यांचे मनःपुर्वक आभार मानतो. या पुस्तकाच्या विनामूल्य ई वितरणाच्या परवानगीबद्दल ई साहित्य प्रतिष्ठान. ग्रंथाली, मुंबई यांचे मनःपूर्वक आभार मानते.

वाचकांनी वाचून झाल्यावर हे पुस्तक जास्तीत जास्त वाचकांपर्यंत पोहचवावे (Forward and viral) अशी विनंती आम्ही सर्व वाचकांना करतो.

पुस्तकावरील आपले अभिप्राय

**श्री. अशोक बेंडखळे** यांना **9869258585**

या क्रमांकावर कळवावे.


ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

esahity@gmail.com

Whatsapp- 9987737237


विनामूल्य पुस्तके मिळवण्यासाठी नाव आणि गाव

Whatsapp करा

User2: \E:\Aniruddha\2022 Books\Ashok Bendakhale\Maharani Yesubai\First Pages.pmd

# महाराणी येसूबाई

अशोक बेंडखळे

ग्रंथाली

ग्रंथाली प्रकाशन क्रमांक ११८३

ISBN No. 978-93-5795-00 ????

**महाराणी येसूबाई**
अशोक बेंडखळे

पहिली आवृत्ती : २५ नोव्हेंबर २०२२

© अशोक बेंडखळे
२/३०९ 'डी', विमान दर्शन, सहार रोड,
अंधेरी (पूर्व), मुंबई - ४०००६९.
भ्रमणध्वनी : ९८६९२५८५८५
ashok.bendkhale@gmail.com

प्रकाशन
ग्रंथाली
१०१, १/बी विंग 'द नेस्ट',
पिंपळेश्वर को-ऑप. सोसायटी,
टायकलवाडी, स्टार सिटीसमोर,
मनोरमा नगरकर मार्ग, माहीम (प.), मुंबई ४०००१६
दूरध्वनी : (०२२) २४२१६०५०
granthalibooks@gmail.com

मुखपृष्ठ आणि आतील रेखाचित्रे : प्रमोद जोशी

अक्षरजुळणी : ग्रंथाली संगणक विभाग

मुद्रण
इंडिया प्रिंटिंग वर्क्स,
इंडिया प्रिंटिंग हाऊस,
४२, जी. डी. आंबेकर मार्ग,
वडाळा, मुंबई ४०० ०३१

**मूल्य १०० रुपये**

*छोटा नातू अर्जुन यास–*
*दुबईत राहून मराठी शिकण्याची तुझी धडपड कौतुकास्पद*

# मनोगत

छोट्या मुलांसाठी इतिहासातील पराक्रमी स्त्रियांची चरित्रे लिहायची हे माझ्या मनात खूप वर्षांपासून होते. सहा वर्षांपूर्वी राजा प्रकाशनाचे मुळे यांनी सुचवल्याप्रमाणे आधुनिक काळातील पाच स्त्रियांची चरित्रे लिहिली आणि 'महाराष्ट्राच्या पंचकन्या' या मालिकेअंतर्गत सावित्रीबाई फुले, पंडिता रमाबाई, लक्ष्मीबाई टिळक, रमाबाई रानडे आणि आनंदीबाई कर्वे या छोटेखानी पुस्तकांची निर्मिती झाली. डोक्यातला मूळ विचार गेला नव्हता. त्यातून राणी लक्ष्मीबाईंचे छोटे चरित्र लिहिले आणि 'ग्रंथाली'च्या सुदेश हिंगलासपूरकर यांना भेटलो. ते तात्काळ म्हणाले, 'एक पुस्तक का? पाच पुस्तके करूया.'' अशाप्रकारे 'ऐतिहासिक पंचकन्या' अंतर्गत राजमाता जिजाई, महाराणी येसूबाई, महाराणी ताराबाई, अहिल्याबाई होळकर आणि राणी लक्ष्मीबाई अशी पाच पुस्तके तयार झाली.

येसूबाईंचे चरित्र अभ्यासताना खूप वेगळी माहिती कळली. संभाजी राजा नंतर स्वराज्य सुस्थितीत राहावे म्हणून तिने आपल्या छोट्या मुलासह औरंगजेबापुढे समर्पण स्वीकारले आणि जवळपास तीस वर्षे मोगलांच्या कैदेत काढली. येसूबाईंचे वैशिष्ट्य असे की, तिने आपल्या संसारिक आपत्तींची सांगड मराठी राज्याबरोबर जोडली नाही. आपल्या मुत्सद्देगिरीने, धीरोदत्त, निःस्वार्थी वागणुकीने मराठी राज्याची शकले होऊ दिली नाहीत. तिचे हे योगदान खूप महत्त्वाचे आहे.

येसूबाईंचे हे छोटे चरित्र प्रसिद्ध होताना खूप आनंद होतो आहे. चित्रकार प्रमोद जोशी यांनी प्रसंगानुसार सुंदर रेखाचित्रे काढली आहेत. मुखपृष्ठही मोहक रेखाटले आहे. त्यांचे तसेच पुस्तक देखण्या रूपात प्रसिद्ध केल्याबद्दल 'ग्रंथाली'चे सुदेश हिंगलासपूरकर यांचे मनःपूर्वक आभार!

■ **अशोक बेंडखळे**

# अनुक्रम


१. येसूबाईंचे लग्न / १

२. राज्यकारभाराचे धडे / ६

३. पराक्रमी संभाजी राजे / १३

४. संभाजीराजांचा राज्याभिषेक / २१

५. संभाजीराजांच्या वधानंतर / २७

६. येसूबाई मोगलांच्या कैदेत / ३१

७. शाहूराजे आणि येसूबाईंची सुटका / ३७

८. येसूबाईंच्या कार्याचा मागोवा / ४५

# १. येसूबाईंचे लग्न

छ. शिवाजी महाराजांची सून आणि संभाजी महाराजांची पत्नी म्हणजे महाराणी येसूबाई आपल्याला माहीत आहेत. मात्र संभाजी राजांच्या क्रूर वधानंतर तिने ज्या धीरोदात्तपणे हिंदवी स्वराज्यावर कोसळलेल्या संकटाशी सामना केला. त्यासाठी आयुष्याची जवळपास तीस वर्षे मोगलाच्या कैदेत काढली, अनंत यातना सोसल्या. त्या गोष्टी आपल्याला तितक्याशा परिचित नाहीत. महाराणी येसूबाईंनी आयुष्यात शेवटपर्यंत जी स्वराज्यनिष्ठा दाखवली आणि निःस्वार्थपणाचे दर्शन घडविले त्याला इतिहासात तोड नाही. तिचे निर्मळपण, आगळे व्यक्तिमत्त्व तमाम स्त्रियांना स्फूर्तिदायक ठरेल असे आहे.

सुप्रसिद्ध शिर्के घराण्यातील पिलाजी शिर्के यांची कन्या येसूबाई. तिचे माहेरचे नाव जिऊबाई असे होते आणि तिला गणोजी व देवजी असे दोन सख्खे भाऊ होते. येसूबाईची आई ही सूर्यराव सुर्वे यांची कन्या. सूर्यराव सुर्वे हा शृंगारपूर इथला आदिलशहाचा जहागिरदार होता. म्हणजे येसूबाईचे मातृघराणे सुर्वे होय.

पिलाजी शिर्के यांचे घराणे महाराष्ट्रातील फार प्राचीन व श्रेष्ठ



असे घराणे मानले जाते. शिर्के घराणे सूर्यवंशी रामराजाच्या कुळातील अस्सल क्षत्रिय असा त्याचा उल्लेख इतिहासात केला गेला आहे. उत्तरेकडून शके ७०५ मध्ये शिर्के दक्षिणेत आले. रायगडावर फौज एकत्र करून त्यांनी तिथे वास्तव्य केले. व्रजपाल हा शिर्के घराण्याचा मूळ पुरुष. मुसेखोरे येथील शिरकाई देवीची स्थापना त्याने शिरकावती या गावी केली. पूर्वी शिर्के यांचे आडनाव कुटूर असे होते. शिरकाई देवीचे भक्त म्हणून त्यांचे आडनाव शिर्के असे पडले असावे. व्रजपालाच्या वंशजानी मुसलमानांशी प्रखर लढा देऊन कोकण प्रांतात आपली घराणी प्रस्थापित केली. त्यामुळे शिर्के घराण्याचे वास्तव्य कोकण प्रांतात अनेक वर्षे राहिले. इ.स. १४६९ नंतर शिर्के यांनी कोकणातून स्थलांतर केले आणि ते देशावर आले. त्यांनी जावळी प्रांतात आपले बस्तान बसवले. पुढे मोरे यांनी जावळी प्रांतावर कब्जा मिळवला त्यामुळे शिर्के तळकोकणात शृंगारपूर येथे आले. तिथे सूर्यराव सुर्वे यांच्या आश्रयाला ते आले.

शृंगारपूरचा सूर्यराव सुर्वे हा आदिलशहाचा जहागिरदार होता.

शृंगारपूरला आल्यानंतर पिलाजी शिर्के (म्हणजे येसूबाईचे वडील) सुर्वे यांचे कारभारी म्हणून जबाबदारीचे काम पाहू लागले. सुर्वे यांनी आपली मुलगी पिलाजीराव शिर्के यांना देऊन सोयरिक केली आणि विजापूरच्या बादशहाकडून दाभोळ येथील मामलेरायरीची देशमुखी शिर्के यांना देवविली.

सूर्यराव सुर्वे हा शूर होता. शृंगारपूरच्या निबिड अरण्याचा तो जणू स्वामी झाला होता. या अजिंक्यपदाची त्याला घमेंड चढली होती तळकोकणात सुर्वेशिवाय आणखी एक मातब्बर जहागिरदार होता. त्याचे नाव होते जसवंतराव दळवी. त्यावेळी विजापूरच्या आदिलशाहीत बेबंदशाही माजली होती. त्याचा फायदा घ्यावा म्हणून शिवाजी महाराजांनी तळकोकण–मोहीम काढली. शिवाजी महाराज दाभोळला पोचल्याची खबर जसवंतरावला मिळाली आणि तो घाबरला. जसवंतराव सूर्यराव सुर्वे यांच्या आश्रयाला गेला. सूर्यरावांनी जसवंतरावास आश्रय दिला. सूर्यराव आणि जसवंतराव हे दोघे जहागिरदार यवनांना मिळाले असल्यामुळे त्यांचे एकत्र येणे महाराजांना योग्य वाटले नाही. जावळीच्या चंद्रराव मोरे यांचा जसा त्यांनी कायमचा बंदोबस्त केला होता तसाच निःपात या दोघा जहागिरदारांचा करणे महाराजांना आवश्यक वाटले.

शिवाजी महाराज दाभोळ, संगमेश्वर, राजापूर असे मुलुख लुटत लुटत मालवणला पोचले. त्यांनी सूर्यरावास निरोप पाठवला. पण त्यांनी काहीच कळवले नाही वा भेटण्यास आला नाही. महाराजांनी शृंगारपूरवर छापा घातला. सूर्यराव पळून गेला आणि शृंगारपूर महाराजांच्या ताब्यात आले. शृंगारपूरला एक किल्ला वसला होता. महाराजांनी त्या किल्ल्याला भेट दिली आणि त्या किल्ल्याला नाव दिले प्राचीनगड.

त्यावेळी शिवाजी महाराजांनी आणखी एक चांगली गोष्ट केली.

सूर्यराव सुर्वे यांचे कारभारी पिलाजीराव शिर्के यांना आपल्या बाजूला वळवले. आता पिलाजीराव महाराजांच्या पदरी सेवेत दाखल झाले. पिलाजीराव शिर्के शृंगारपूरला शिवाजी महाराजांना मिळाल्यावर त्यांनी शिर्क्यांशी नातेसंबंध जोडून आपले संबंध अधिक दृढ केले. शिवाजी महाराजांची कन्या राजकुंवरबाई उर्फ नानीबाई पिलाजीरावांचा पुत्र गणोजीला देण्याचे नक्की झाले आणि पिलाजीरावांची एकमेव कन्या जिऊबाई हिचा हात आपला पुत्रे संभाजी राजांसाठी मागितला. पिलाजीराव या दुहेरी सोयरिक संबंधाने खूष झाले नसते तरच नवल! त्यांना अतिव आनंद झाला.

येसूबाईंविषयी अधिक माहिती कुठे उपलब्ध नाही. संभाजी–राजांबरोबर तिचा विवाह १६६५ च्या सुमारास झाला असावा असे अनुमान बखरीच्या नोंदीवरून काढता येते. त्यांचे वय त्यावेळी ५–६ वर्षांचे असावे. शिर्के घराणे हे मातब्बर घराण्यांपैकी एक होते आणि त्यावेळी मातब्बर घराणी आपल्यी पदरी विद्वान ब्राह्मण बाळगीत असत. शिर्के घराण्याकडे केशव पंडित आणि रघुनाथ पंडित हे दोन विद्वान ब्राह्मण होते. येसूबाईंचे संभाजीराजांबरोबर लग्न झाल्यानंतर येसूबाईंसोबत हे दोन पंडित शिवाजीराजांकडे आले. शिवाज महाराज आणि संभाजी राजे यांना त्यांनी प्रयोगरूप रामायण ऐकविल्याची नोंद इतिहासात सापडते.

केशव पंडित हा संगमेश्वरचा रहिवासी होता आणि ऋग्वेदी वेदाध्यायी, संस्कृत विद्यावेत्ता असा संस्कृत पंडित होता. शिवाजी महाराजांकडे आल्यानंतर तो घरातील सर्व धार्मिक बाबींचा पुरोहित म्हणून वावरू लागला. शिवाजी राजांनी आपला पुत्र संभाजीला शिक्षण देण्याची जबाबदारी सुद्धा या विद्वान गुरुजींवर टाकली आणि त्याप्रमाणे केशव पंडित संभाजीराजांना शिकवू लागले. या गुरूने आपला शिष्य संभाजी राजांचा उल्लेख सकल शास्त्राचा अभ्यासक आणि जाणकार

असा एका ग्रंथात केलेला आहे. दुसरे विद्वान म्हणजे रघुनाथ पंडित. तेही विद्याव्यासंगी जाणकार होते. शिवाजी महाराजांबरोबर ते पुरंदर तटाच्या वेळी होते. तसंच आग्र्याला महाराज शंभूराजेंसमवेत औरंगजेबाला भेटायला गेले असता ते महाराजांसोबत होते.

अशा दोन विद्वान पंडितांचा सहवास व मार्गदर्शन येसूबाईंना त्यांच्या माहेरी लाभले. तसेच ते दोघे त्यांच्याबरोबर आल्यामुळे सासरीसुद्धा लाभले. त्यांच्या सहवासात त्यांचे शिक्षण होण्याबरोबर सुसंस्कारही घडत गेले. याशिवाय सासरी त्यांना आजेसासूबाई जिजाबाई यांचा सहवास लाभला. जिजाई या तर साक्षात दुर्गा रूपमती. शिवाजी महाराजांच्या तर बालपणापासून मार्गदर्शक सुहृद. अनेक समरप्रसंगी त्यांनी पुत्र शिवाजी महाराजांना सल्ले दिले, योग्य मार्ग दाखवला. जिजाबाईंचे बोलणे, चालणे, वागणे येसूबाई न्याहाळीत होत्या. त्यांनी केलेल्या सुसंस्कारांचा लाभसुद्धा नकळत येसूबाईंना झाला. संभाजी राजे युद्धकलेत पारंगत होते तसेच संस्कृतचे जाणकार होते. त्यांच्या सहवासाचा फायदा पत्नी म्हणून येसूबाईंना झाला.

या सगळ्याहून कढी झाली ती त्यांचे सासरे शिवाजी महाराजांच्या अष्टावधानी रूपाच्या दर्शनांनी. शिवाजी महाराज ज्या अनेक समर प्रसंगातून, मोहीमांमधून जात होते, वेळोवेळी जे निर्णय घेत होते आणि समयसूचकतेने शत्रू पक्षावर मात करून यशस्वी होत होते तर कधी सन्मानपूर्वक तह करून माघार घेत होते आणि हे सगळे येसूबाईंच्या समोर घडत होते. यातून नकळत त्यांचे शिक्षण होत होते आणि सुसंस्कार घडत होते.

■

# २. राज्यकारभाराचे धडे

येसूबाईंच्या आयुष्यावर नकळत राजमाता जिजाई आणि शिवाजी महाराज यांच्या कार्यकर्तृत्वाचा आणि स्वभावात असलेल्या अनेक गुणांचा प्रभाव पडला यात शंका नाही. यासाठी इतिहासकार इतिहासातील काही घटनांची साक्ष देतात. शिवाजी महाराजांनी पुरंदर किल्ल्यावर मोगलांनी हल्ला केला त्यावेळी तह करताना ज्या अटी





घातल्या होत्या तशाच अटी येसूबाईंनी पुढे घातल्या. तो प्रसंग होता जेव्हा मोगलांच्या झुल्फिकारखान या सरदाराने संभाजी राजांच्या वधानंतर लगेच रायगडाला वेढा घातला तेव्हा येसूबाईंनी प्रसंगाचे गांभीर्य ओळखून औरंगजेबाशी तह करण्याचा निर्णय घेतला आणि आपल्याला कैद करून घेतांना सन्मानपूर्वक अटी बादशहाकडून मान्य करून घेतल्या. त्याचप्रमाणे राजमाता जिजाई ज्या तडफेने कारभार हाकित होत्या, शिवाजी राजांना मार्गदर्शन करीत होत्या, आणि हिंदवी स्वराज्यासाठी वेळोवेळी प्रोत्साहन देत होत्या, त्या सगळ्याचे येसूबाई बारकाईने निरीक्षण करीत होत्या. आणि राज्यकारभाराचे प्राथमिक धडे गिरवीत होत्या. संभाजी राजे आणि येसूबाई यांची वाढ जिजामातेच्या प्रेमळ छत्राखाली झाली. त्यांनी आयुष्यभर ज्या स्वराज्यविषयक कल्पना, धर्मविषयक जाणीवा आणि सामाजिक विषयांचे संगोपन केले. सर्वसामान्य रयतेचे हित पाहिले. त्या सगळ्या बाबी या दोघा पती-पत्नींमध्ये उतरल्या असल्यास नवल नव्हते.

शिवाजी महाराजांनी हिंदवी स्वराज्यासाठी केलेल्या मोहीमा,

त्यांचे पराक्रम निर्णय घेण्याची समयसूचकता आणि जिजामातेचे संस्कारक्षम वागणे हे सगळे या दोघांच्या व्यक्तिमत्त्वाचा एक भाग झाले आणि पुढे आयुष्यात या दोघांचा आधार गेल्यानंतर त्यांनी मराठ्यांच्या राज्याचा ज्या प्रकारे सांभाळ केला आणि त्याचे जिवापाड रक्षण केले, ते पाहता त्या दोन महान व्यक्तिमत्त्वाच्या संस्कारांचा त्यांना नक्की फायदा झाला असे ठामपणे म्हणता येते.

शिवाजी महाराजांनी महाराष्ट्रात हिंदवी स्वराज्याची स्थापना करून भारताच्या इतिहासात एक नवे पर्व सुरू केले. अशा लोकोत्तर व्यक्तिमत्त्वाच्या राष्ट्रनिर्मात्या शिवाजी महाराजांची स्नुषा होण्याचे परमभाग्य येसूबाईंना लाभले तसेच महाराजांच्या आयुष्यातील काही दैदिप्यमान घटनांचे साक्षीदार होण्याची संधी त्यांना मिळाली आणि त्यातून त्यांची जडणघडण होत गेली.

विजापूरचा आदिलशहा आणि मोगल बादशहा औरंगजेब यांच्याशी शिवाजी महाराजांचा सातत्याने संघर्ष झाला. आदिलशहाचे दक्षिणेकडील अनेक प्रदेश जिंकत शिवाजी राजांनी त्याला त्रस्त केला. मात्र औरंगजेब अधिक ताकदवान होता. त्याने १६६५ साली शिवाजी राजाविरुद्ध प्रचंड मोहिम आखली. मिर्झाराजे जयसिंग ऐशी हजाराची फौज, पाच हजार पठाणांचा ताफा आणि प्रचंड तोफांचा फौजफाटा घेऊन महाराष्ट्रात उतरला. महाराष्ट्रात येताच मिर्झा जयसिंगाने सुपे, जुन्नर, लोणी, पुणे, शिरवळ वगैरे ठिकाणी हैदोस घातला. मिर्झाने दलेरखानसह ३१ एप्रिल १६६५ रोजी पुरंदर किल्ल्याला वेढा घातला. तह करणे भाग होते. मिर्झाने राजांकडे संपूर्ण शरणागती मागितली. राजांना रयतेचा विध्वंस टाळण्यासाठी मिर्झाच्या संपूर्ण म्हणण्याला होकार द्यावा लागला. तह झाला. राजांना तेवीस गड, चार लक्ष होनांच्या मुलुखासह मोगलांना द्यावे लागले. शिवाजी राजांकडे अवघे बारा गड राहिले आणि एक लाखाचा मुलुख राहिला. संभाजीराजे

मोगली मनसबदार झाले.

संभाजी राजांना घेऊन शिवाजी महाराजांना आग्र्यास औरंगजेब बादशहाच्या भेटीस जावे लागले. त्यावेळी येसूबाई-संभाजी राजे यांचे लग्न नुकतेच झाले होते. घरात आलेल्या नववधूच्या समोर हे सारे घडले होते. त्यावेळी येसूबाई केवळ ५-६ वर्षांच्या होत्या.

निवडक मंडळी आणि आपला चार हजार स्वारांचा ताफा घेऊन शिवाजी महाराज शंभू राजेंसह आग्र्याला गेले. शंभूराजे त्यावेळी नऊ वर्षांचे होते. १२ मे १६६५ या दिवशी शिवाजी महाराज संभाजी राजांसह औरंगजेबाच्या दरबारात हजर झाले. बादशहानं दगाफटका केला आणि एक कपटी कारस्थान रचल्याचे राजांना हेरांकडून कळले. ते बेचैन झाले. आग्र्याहून बाहेर पडणे कठीण होत आहे हे लक्षात येताच राजांनी एक धाडसी योजना आखली आणि औरंगजेबाला चकवा देऊन त्याच्या नजर कैदेतून शिताफीने निसटले. वेषांतर करून मजल दरमजल करीत रायगडावर परत आले. येतांना संभाजीराजांना मथुरेमध्ये कृष्णाजी त्रिमल यांच्याकडे ठेवले. त्यांच्या जिवाला काही अपाय होऊ नये म्हणून त्यांचा मृत्यू झाल्याची अफवा पिकवली. त्यावेळी ६-७ वर्षांच्या लहानग्या येसूबाई खूप चिंतेत होत्या. काही दिवसांनी कृष्णाजीपंतांनी संभाजीराजांना सुखरूपपणे रायगडावर पोहोचवले. या साऱ्या घटना येसूबाईच्या कोवळ्या मनावर कोरल्या गेल्या.

शिवाजी महाराज आग्र्याहून सुटून आल्यावर त्यांनी मोहीमांचा तडाखा लावला. पुरंदरच्या तहात गेलेला सारा मुलुख व किल्ले घेतले, आणखीही प्रदेश स्वामित्वाखाली आणला. राजांनी आपला लाडका कोंडाणा (सिंहगड) जिंकल्यावर पंधरा-वीस दिवसांनी जिजामातेची दुसरी सून सोयराबाई प्रसूत होऊन तिला मुलगा झाला (२४.०२.१६७०). मुलाचे नाव राजाराम ठेवण्यात आले. महाराजांनी

थोड्याच दिवसात आपल्या कुटुंबाचा मुक्काम राजगडावरून रायगडावर हलवला.

रामदेवराव यादवांच्या विजयनगरच्या साम्राज्याच्या पाडावानंतर म्हणजे १५६५ पासून जवळपास १०९ वर्षे हिंदुस्थानात कोठेही हिंदुपदपातशाही अस्तित्वात नव्हती. सगळीकडे मोगलाचे साम्राज्य, पातशाह्या तर इतर दिशांना परकीयांच्या गाद्या होत्या. तमाम लोकांना हिंदवी स्वराज्याची प्रचिती देणे शिवाजी राजांना आवश्यक वाटले आणि त्यांनी रायगडावर राज्याभिषेक करून घ्यायचे नक्की केले.

शिवाजीराजे शहाजीराजे भोसले यांचा राज्याभिषेक सोहळा किल्ले रायगडावर संपन्न झाला, तो दिवस होता शुक्रवार ज्येष्ठ शुद्ध त्रयोदशी शके १५९६ (६ जून १६७४)

राजमाता जिजाई हा कौतुक सोहळा पाहत होत्या. त्यांच्या मनातले हिंदवी स्वराज्य निर्माण झाले होते. तिचा पराक्रमी पुत्र शिवाजी शिवकल्याण राजा झाला होता.

या सोहळ्याचे समर्थ रामदासांनी वर्णन केले ते अशा शब्दात –

मनासी प्रचिती आली। शब्दी विश्वास वाटला
कामना पुरती सर्वे। आनंद वन भुवनी।।

शिवाजीराजांबरोबर संभाजीराजांचे व्रतबंधन झाले. संभाजीराजांच्या युवराजपदाचा अभिषेक झाला आणि येसूबाई युवराज्ञी झाल्या. या राज्याभिषेकानंतर संभाजीराजे अभिषिक्त युवराज, राजपुत्र झाले आणि त्यांनी युवराजपदाची वस्त्रे परिधान केली.

या वैभवशाली समारंभात दूरदूरहून आलेले सरदार आणि मानकरी आदी उपस्थित होते. त्यांनी महाराजांना व युवराजांना मुजरे करून नजराणे सादर केले. त्यावेळी इंग्रज कंपनीतर्फे हेन्री ऑक्सिंडन हा वकील उपस्थित होता. त्यानेही महाराजांना नजरांना पेश केला.

या राज्याभिषेक समारंभाचे वर्णन इंग्रज वकील हेन्री ऑक्सिंडन याने आपल्या ६ जून १९७४ रोजी लिहिलेल्या दैनंदिनीत केले आहे. ते त्याच्या शब्दात असे –

''संभाजी राजे, पेशवा मोरोपंत आणि एक श्रेष्ठ ब्राह्मण सिंहासनावरती उंच तट्यावर बसले होते. राहिलेले सेनाध्यक्ष व तीन अंमलदार बाजूला आदराने उभे होते. मी मुजरा केला आणि नारायण शेणव्याने नजरेची अंगठी वर धरली. शिवाजीचे आमच्याकडे लक्ष जाताच त्यांनी अगदी सिंहासनाच्या पायरीजवळ दोन्ही बाजूला हुकूम केला व पोषाख देऊन आम्हाला तत्काळ रजा दिली. थोड्याच वेळ आम्ही सिंहासनासमोर होतो. तेवढ्या वेळा सिंहासनाच्या दोन्ही बाजूला सुवर्णांकित भाल्यांच्या टोकावर (मुसलमान पद्धतीची) अनेक अधिकारदर्शक व राजसेवेची चिन्हे असल्याचे आम्ही पाहिले. उजव्या बाजूला दोन मोठ्या दातांच्या मत्स्यांची सुवर्णाची मोठी शिरे होती. डाव्या हाताला अनेक अश्वपुच्छे व एका मूल्यवान भाल्याच्या टोकावर समपातळीत लोंबणारी सोन्याच्या तराजूची पारडी, न्यायचिन्ह म्हणून तळपत होती. राजवाड्याच्या दाराशी आम्ही परत आलो. तो दोन लहान हत्ती दरवाजाच्या दोन्ही बाजूला उभे केले असून दोन सुंदर (पांढरे) घोडे शृंगारून आणलेले दिसले. गडाचा मार्ग इतका बिकट होता हे लक्षात घेता हे पशू कोठून वर आले असावेत याचा आम्हाला तर्कच करवेना.''

राज्याभिषेक समारंभात शिवाजीराजांच्या पत्नी सोयराबाई यांना महाराणीपदाचा अभिषेक झाला. संभाजीराजे युवराज झाले, महाराष्ट्राचे पहिले राजपुत्र झाले. यापूर्वी मराठेशाहीत सर्वच सरदारपुत्र होते. शिवाजीराजेसुद्धा परक्यांच्या राज्यातील सरदार शहाजीराजांचे पुत्र म्हणून सरदार पुत्र होते. विजयनगर साम्राज्यानंतर महाराष्ट्रात प्रथम हिंदवी राज्य शिवाजीराजांनी पराक्रमाने स्थापन केले होते. तेव्हा भोसले

घराण्यातील पहिला राजपुत्र पदाचा, युवराजपदाचा मान संभाजीराजांना मिळाला होता आणि त्यांच्या पत्नी म्हणून येसूबाई महाराष्ट्राच्या पहिल्या युवराज्ञी झाल्या होत्या.

सकळ मनोरथ पूर्ण झाल्याने आणि जीवन कृतार्थ झाल्याने जिजामाता आनंदाने रायगडाच्या पायथ्याशी असलेल्या पाचाड गावी आल्या. आपला पराक्रमी पुत्र महाराष्ट्राचा राजा झाल्याचा आनंद त्या केवळ काही दिवस मनात साठवू शकल्या. राज्याभिषेकानंतर केवळ अकराव्या दिवशी ज्येष्ठ वद्य ९ शके १५९६ म्हणजे बुधवार दि. १७ जून १६७४ या दिवशी पाचाड गावी त्यांनी इहलोक सोडला.

आयुष्यात अनेक समरप्रसंगी मार्गदर्शन व आशीर्वाद देणाऱ्या मातोश्रींच्या निधनाने शिवाजीराजांना अतिशय दुःख झाले. संभाजी राजांना तर आपल्याला जन्म देणाऱ्या आईचा सहवास केवळ अडीच-दोन वर्षेच लाभला होता. आईनंतर जिजामातेने लाडक्या नातवाचा खूप जिव्हाळ्याचे व मायेने सांभाळ केला होता. शिवाजीमहाराजांचा आधार तुटला तर संभाजीराजे पोरके झाले. जीवनात पोकळी निर्माण करणारे हे पोरकेपण शंभूराजांनी जन्मापासून अनुभवले होते.

येसूबाईंचाही मोठा आधार तुटला होता. आता येसूबाई संभाजीराजांच्या आधार बनल्या. त्यांना धीर देण्यास सज्ज झाल्या.

■

# ३. पराक्रमी संभाजी राजे

शिवाजी महाराजांना पहिल्या तीन मुलीच होत्या. त्यानंतर १४ मे १६५७ या दिवशी संभाजीचा जन्म पुरंदर येथे झाला. शिवाजी महाराजांचा दुसरा पुत्र राजाराम याचा जन्म १६७० साली झाला. पहिला पुत्र म्हणून संभाजी हा सगळ्यांच्या कौतुकाचा विषय बनला होता. राज्याचा भावी वारस म्हणून संभाजीकडे पाहिले जात होते. त्यांचे युवराज असणे हे त्याच्या मनावर सातत्याने बिंबवले गेले होते. जिजाबाईंनी त्याला रामायण महाभारतातल्या गोष्टी सांगितल्या होत्या. केशव पंडित आणि रघुनाथ पंडित या दोघांची व्यवस्था संभाजीला शिक्षण देण्याकरता बालपणी करण्यात आली होती. त्यामुळे संस्कृत भाषेचे त्याला चांगले ज्ञान होते, जाण होती. संभाजीने विद्या अभ्यास करावा, त्याला सुशिक्षित करावा म्हणून जसे त्याला पंडितांकरवी शिक्षण देण्यात आले तसेच रणांगणामधले शिक्षण मिळावे म्हणून पाहिले गेले आणि त्याला घोड्यावर बसणे, शस्त्र विद्या, तालीम, तिरंदाजी याचे शिक्षण देऊन त्यातही पारंगत करण्यात आले.

विवाहानंतर भावी युवराज म्हणून संभाजीराजांची अनेक रूपे

येसूबाईला अगदी जवळून पाहता आली. संभाजीराजांच्या अंगी असलेले राज्यकारभारातील चातुर्य व त्यातला सहभाग याचे अवलोकन तिला करता आले. १२ जून १६६५ ला शिवाजी महाराज व मोगल सरदार मिर्झाराजे जयसिंग यांच्यात झालेल्या भेटीनंतर छोट्या संभाजीचा केवळ आठव्या वर्षी राजकारणात प्रवेश झाला. मातोश्री जिजाई या वृद्ध झाल्यामुळे महाराजांच्या गैरहजेरीत रायगडावरील कारभार मुखत्यारीने करण्याची जबाबदारी संभाजीराजांवर टाकण्यात आली होती. (दि. १६ जानेवारी १६७१). मंत्रीमंडळातील इतर आणि मुत्सद्दी मंडळी त्यांना मदत करायला होती पण मुखया म्हणून त्याच्याकडे पाहिले जात होते. राज्यकारभाराचे शिक्षण घेत असताना इंग्रजांशी संभाजीराजांचा संबंध आला.

शिवाजी महाराजांशी तह करण्याकरिता इंग्रज वकील थॉमस निकोल्सन एकदा आला. महाराजांच्या गैरहजेरीत संभाजी राजांना इंग्रज वकीलाशी प्राथमिक बोलणी करण्याचा प्रसंग आला. या प्रसंगात संभाजीने लहान वयात जो मुत्सद्दीपणा दाखवला त्याला तोड नाही. ती घटना अशी – शिवाजी महाराजांची भेट होत नसल्यास त्यांचा मुलगा किंवा जो अधिकारी असेल त्याला भेटून येण्याची सूचना वकील निकोल्सनला देण्यात आली होती. खरं म्हणजे शिवाजी महाराजांना त्यांच्या गैरहजेरीत पिलाजीराव शिर्के (संभाजीचे सासरे व येसूबाईचे वडील) यांना इंग्रजांशी तह करण्याचे अधिकार दिले होते. लहान असूनही संभाजीराजांनी निकोल्सनची भेट घेतली आणि त्याच्या कामाचे स्वरूप ऐकून घेतले. कामाचे स्वरूप कळल्यानंतर आपल्याला काही करता येणार नाही हे त्यांच्या लक्षात आले. तेव्हा त्यांनी वकीलाला स्पष्टपणे सांगितले की, मला या बाबतीत काही करता येणार नाही. तुम्ही आल्याचे मी महाराजांना कळवतो म्हणजे ते लवकर येतील. त्याचबरोबर त्या वकीलाला गडाची हवा तुम्हाला मानवणार

नाही तेव्हा गडाखाली जाऊन रहा, हे सांगण्यासही ते विसरले नाहीत. महाराजांच्या पश्चात इंग्रज वकीलाला गडाबाहेर राहण्याची सूचना मोठ्या चातुर्याने दिली. त्यातून त्या वयातील संभाजीराजांची चतुराई ध्यानात येऊ शकते.

शिवाजी महाराजांच्या कारकिर्दीतील स्वराज्यातील वतनाबाबतच्या कारभारात संभाजीराजे भाग घेत असत असा उल्लेख दोन पत्रांमधून मिळतो. महाराजांनी धूर्तपणे आपल्या पुत्राला दिलेल्या प्रशिक्षणाचा हा भाग असावा.

औरंगजेबाच्या सैन्याशी लढताना सगळ्या आघाड्यांवर संभाजीराजांनी जो पराक्रम केला त्यात त्यांना मिळालेल्या युद्धशिक्षणाचे प्रतिबिंब पडलेले दिसले. शिवाजी महाराजांनी संभाजीराजांचे युद्ध कौशल्य पाहून त्यांना १० हजार सैन्याचे नेतृत्व दिले. ते सैनिकांमध्ये अतिशय प्रिय होते. त्यांच्याविषयी ॲबे कॅरे हा फ्रेंच प्रवासी लिहितो ते महत्त्वाचे आहे. तो म्हणतो, 'युवराज लहान आहे. तरी धैर्यवान आणि आपल्या वडिलांच्या कीर्तीला शोभेल असा पराक्रमी वीर आहे. शिवाजीसारख्या युद्धकुशल बापाच्या बरोबर राहून तो युद्ध कलेत तरबेज झाला असून चांगल्या अनुभवी सेनापतीची बरोबरी करील इतका तो तयार आहे.' संभाजीराजांच्या स्वरुपाविषयी त्याचे निरीक्षण सूक्ष्म व मार्मिक आहे. तो पुढे म्हणतो, 'तो मजबूत बांध्याचा योद्धा तरुण असून तो अति रुपवान आहे. त्याचे सौंदर्य हाच गुण सैनिकांना त्याच्याकडे आकर्षित करण्यास उपयुक्त ठरतो आहे. सैनिकांचे त्याच्यावर खूप प्रेम आहे. सैनिक त्याला खूप मान देतात आणि त्याच्या हाताखाली काम करण्यात त्यांना धन्यता वाटते. कारण कुठलाही कर्तबगारीचे श्रेय तो आपल्याकडे घेत नाही तर ते श्रेय तो आपल्या सैनिकांचे मानतो. त्याच्या या गुणांमुळे सैनिक त्याच्यावर शिवाजी महाराजांएवढेच प्रेम करतात.'

शिवाजी महाराजांनी संभाजीराजांकडे १० हजार सैन्य देऊन त्यांना खानदेश व गुजरात प्रांताच्या राजांवर स्वारी करण्याचा हुकूम दिला. आपल्या वडीलांनी आपल्यावर एवढी महत्त्वाची व मोठी कामगिरी सोपवली याची संभाजीराजांना धन्यता वाटली आणि मोठ्या उत्साहाने कामगिरी फत्ते करण्यासाठी ते सैन्यानिशी निघाले. विशेषतः कारभाराच्या प्रारंभीच एवढी मोठी जबाबदारी महाराजांनी आपल्यावर विश्वासाने सोपवली याच्या आनंदाबरोबर परम समाधान वाटले आणि ते पराक्रम करून दाखवायला तयार झाले. संभाजीराजांच्या नावाचा दरारा एवढा झाला होता की ज्यांच्यावर ते स्वारी करून जाणार होते ते राज्यकर्ते त्यांच्या नावाच्या उल्लेखाने पळून गेले. त्यामुळे त्या प्रांतावर कब्जा करणे संभाजीराजांना सोपे गेले आणि थोड्या अवधीत बराचसा प्रदेश त्यांनी यशस्वीपणे आपल्या ताब्यात आणला. त्यांच्या या पराक्रमाने या बालराजांची सर्वत्र प्रशंसा झाली. याचा उल्लेखही ॲबे कॅरे या फ्रेंच प्रवाशाने आपल्या नोंदीमध्ये गौरवाने केला होता.

राज्याभिषेकानंतर संभाजीराजांच्या मनात आपण युवराज असल्याची अंहभावना निर्माण झाली. घरातून विशेषतः जिजामातेकडून चांगले संस्कार त्याला मिळाले होते. मात्र वाढत्या वयाबरोबर अधिकाराची जाणीव येत गेली. मोगली सत्तेमधून आलेले व आजूबाजूला दिसत असलेले विलासी आयुष्य, षौक, चैन यांचेही त्याच्या तरुण मनात आकर्षण निर्माण झाले होते. त्यापासून तो पूर्ण अलिप्तही राहू शकला नाही. काही मोगल सरदारांच्या सहवासामधून मैत्रीपूर्ण संबंधातून मोगली वैभव व त्यामधून आलेले मधाळ षौक याची त्याला ओळख होत गेली आणि न कळत वेगळ्या संस्काराची पडछाया संभाजीराजांवर पडू लागली होती. त्यावेळी संभाजी १७-१८ वर्षाचा म्हणजे तरुण होता. सळसळते रक्त त्याच्या अंगात होते. तो सुशिक्षित, सुसंस्कृत, पराक्रमी आणि राज्य कारभाराची जाण येत

असलेला असा युवराज होता. संभाजीवर एका प्रकरणात आरोप करण्यात आला. ती स्त्री उच्च वर्णातील जातीची म्हणजे ब्राह्मण कुटुंबातील होती म्हणून स्वाभाविकपणे त्या प्रकरणाचा गवगवा अधिक झाला. मात्र संभाजीराजांच्या गैरवर्तनाच्या गोष्टी शिवाजी महाराजांपर्यंत कोणी पोहचवत नव्हते.

संभाजीराजांच्या दुष्कृत्यांची माहिती शिवाजी राजांच्या द्वितीय पत्नी सोयराबाई यांच्यापर्यंत आली होती. त्यावेळी त्यांनी राजमाता होण्याची स्वप्ने पाहण्याचा प्रारंभ केला होता. शिवाजी महाराज असल्यामुळे ते या प्रकरणांमध्ये लक्ष घालतील या अपेक्षेने येसूबाई त्यावेळी काही बोलत नव्हत्या, कुठे सांगूही शकत नव्हत्या. येसूबाईनी तिची तगमग कुठे उघड केली नसली तरी तिच्या मनाची घालमेल उडाली होती. एकीकडे भावी राजा तर दुसरीकडे तिचा पती याच्या कात्रीमध्ये ती सापडली होती.

दरम्यान १९७६ मध्ये शिवाजी महाराजांनी कर्नाटक मोहीम आखली. बरोबर त्यांनी ४० हजार पायदळ आणि २० हजार घोडदळ घेतले. रायगडच्या उत्तरेकडील  व दक्षिणेकडील प्रदेशावर मोरोपंत व अण्णाजी दत्तो यांची नेमणूक केली तर रायगडची जबाबदारी राहुजी सोमनाथ या विश्वासू आसामीवर सोपवली. ६ ऑक्टोबर १६७६ ला शिवाजीमहाराज कर्नाटक मोहिमेसाठी रायगडहून निघाले.

शिवाजी महाराजांनी आपल्या कर्नाटकच्या मोहिमेमध्ये संभाजीराजेंना बरोबर घेतले नव्हते. आणि त्यामागे महाराजांचा काही विचार असू शकतो. रायगडाच्या परिसरातील राज्याच्या ज्येष्ठ व श्रेष्ठ अधिकाऱ्यांच्या संपर्कापासून संभाजीला दूर ठेवणे त्यांना आवश्यक वाटले. तसेच रायगडावर होणाऱ्या हालचालीवर कुणाचा तरी वचक राहील म्हणून असेल. दुसरे म्हणजे त्यावेळी संभाजी राजांची पत्नी येसूबाई गरोदर होती त्यामुळे संभाजीराजांना त्यांच्या सासुरवाडीकडील

प्रभावळीचे सुभेदार म्हणून महाराजांनी शृंगारपूरच्या कारभारावर लक्ष ठेवण्यास जाण्याची आज्ञा केली. ऑक्टोबर–नोव्हेंबर १६७६ मध्ये संभाजीराजे येसूबाईसह शृंगारपुरात येऊन दाखल झाले आणि तिथला कारभार त्यांनी हाती घेतला. शृंगारपूरला त्यावेळी पिलाजीराव शिर्के (येसूबाईंचे वडील) सारखा अनुभवी अधिकारी होता.

त्यावेळचे शृंगारपूर हे ठिकाण निबिड असे होते, अनेक झाडे–वेलीच्या मध्ये दाट आरण्याने वेढले होते. बंगाल व काशीहून आलेल्या शाक्तपंथीय विद्वानांनी येथे मठ स्थापन केला होता. शिवयोगी नावाचा सिद्ध पुरुष संभाजीराजांचा या पंथाचा गुरू झाला. तिथल्या वातावरणातील संगतीचा परिणाम संभाजी राजांसारख्या युवकाच्या चंचल मनास आडवाटेला नेण्यास कारणीभूत झाला. समर्थ रामदासांनी म्हंटल्याप्रमाणे, संभाजीराजांचे चित्तोदक या शाक्तपंथी वामचारी उदकात मिसळून गेले आणि अखेर त्यांचे विषात रूपांतर झाले ते कोणास कळले नाही. शेवटपर्यंत हे विष त्याच्या चित्तवृत्तीला दाहक ठरले.

संभाजीराजे अध्ययन करीत असतानाच त्यांचे लक्ष प्रभावळीच्या कारभारावर होते. युवराज म्हणून ते रायगडावरील हालचालींवर बारीक लक्ष ठेवून होते. हे ठिकाण शांत होते पण त्यांचे मन मात्र थाऱ्यावर नव्हते. एका छळणाऱ्या विचाराने ग्रासलेले होते. महाराजांनी कर्नाटक मोहिमेवर जाताना रायगडावरचा कारभार आपल्याकडे का सोपवला नाही, ही ती खंत होती. आपल्यावर झालेल्या या नालस्तीचा सल त्यांच्या मनात खोलवर रूतला होता. त्यांचे मन या विचाराने द्विधा झाले होते. मनाची स्थिती सैरभैर झाली होती. या विचारातून आपण रायगडावर परत जाऊ नये, स्वतंत्र व्हावे, राज्य आपल्या छत्राखाली घ्यावे हा विचार मनात बळावत गेला. त्यांचे मन बंड करीत असतानाच कवी कलशासारखा मित्र त्यांना मिळाला. शाक्तपंथीय तंत्र नावाचा मार्ग त्याने अगोदरच अनुसरला होता. त्याच्या उच्छृंखल मनाने

राज्यप्राप्तीसाठी कलशाभिषेक करण्याचा विचार पक्का केला. गणेश भट, केशव भट, शिवयोगी आणि कवी कलश यांनी त्याला कलशाभिषेक केला. येसूबाईसुद्धा या प्रसंगी हजर होत्या. शाक्तपंथीय तंत्राचा प्रभाव राजांवर एवढा जबरदस्त होता की, येसूबाईसुद्धा संभाजी राजांना अडवू शकल्या नाहीत.

या सुमारास युवराजी येसूबाई प्रसूत झाल्या (४ सप्टेंबर १६७८) आणि शृंगारपुरी संभाजीराजांना भवानी या लेकीचा लाभ झाला.

शिवाजी महाराजांना कर्नाटककडील मोहीमेच्या परतीच्या प्रवासात संभाजीराजांच्या शृंगारपूरकडील हकीगती कानावर आल्या. त्यांनी संभाजीला सज्जनगडावर जाऊन समर्थांना भेटण्यास सांगितले (सप्टेंबर १६७८). मात्र सज्जनगडावर समर्थ रामदास त्यांना भेटले नाहीत. मोगल अंमलदार दिलेरखान याने शृंगारपूरच्या वास्तव्यातच संभाजीराजांबरोबर संपर्क साधला होता. आता कलशाभिषेक झाल्यानंतर सत्तेची हाव व ईर्षा त्यांच्या मनात जोमाने निर्माण झाली होती. दिलेरखानच्या फितव्या राजकारणाचा ते बळी झाले आणि संभाजीराजे दिलेरखानला मिळाले.

शिवाजीमहाराज संभाजीच्या या वर्तनाने अतिशय व्यथित झाले. स्वतःच्या मुलाने युवराज संभाजीने मोगलाच्या दारी जावे ही त्यांना आपल्या आयुष्यातली मोठी शोकांतिका वाटली. महाराजांनी धीर सोडला नाही. संभाजीराजांना परत आणण्याचे प्रयत्न त्यांनी सुरूच ठेवले.

शेवटी संभाजींला मोगली सत्तेचे खरे रूप दिसले. मोगलसेत्तेने रयतेवर केलेले अत्याचार, लूटमार या त्याच्या डोळ्यांसमोर घडलेल्या गोष्टी दिसल्या. आणि त्यांना पश्चात्ताप होऊन ते १६७९च्या डिसेंबर मध्ये पन्हाळ्याला परत आले. संभाजीची समजूत काढण्यासाठी महाराजांनी त्याची तिथे दीर्घकाळ भेट घेतली.

भेटीनंतर शिवाजीमहाराजांनी संभाजीराजांचा निरोप घेतला. राजारामाचं लग्न उरकून परत येतो असे सांगितले. तिथून निघून ते सज्जनगडामागे रायगडावर परत आले. प्रतापराव गुजरांची कन्या जानकीबाई ही राजारामाची वधू निश्चित केली.

महाराज आजारी पडले. त्यांच्या मनात राज्याची घडी नीट बसविण्याच्या काही योजना होत्या. तसेच आप्तेष्टांच्या मनात माजलेल्या गैरसमजुतीवर तोडगा काढण्याचा त्यांचा मानस होता. महाराजांच्या अकस्मित निधनाने या गोष्टी अपुऱ्या राहील्या.

छत्रपती शिवाजीमहाराज चैत्र शुद्ध १५ शके १६०२ रूद्रनाम संवत्सरे हनुमान जयंतीला दोन प्रहरी निजधामास गेले (४ एप्रिल १६८०).

येसूबाईंच्या डोक्यावरचे छत्र हरपले.

■

# ४. संभाजीराजांचा राज्याभिषेक

शिवाजी महाराजांच्या मृत्यूनंतर संभाजी आणि राजप्रतिनिधी यांच्यामधील संघर्ष तीव्र झाला आणि त्याचे कारण होते संभाजीचे महाराजांचा ज्येष्ठ पुत्र असणे. ज्येष्ठ पुत्राला त्यांनी महाराजांच्या मृत्यूची बातमी कळवली नव्हती आणि महाराजांच्या मृत्यूनंतर त्यांचे क्रियाकर्म साबाजी भोसले यांच्याकडून करून घेण्यात आले होते.

संभाजीराजांनी रायगडावरील राजकारणी मंडळींचा बंदोबस्त करण्याकरिता आपले सासरे पिलाजीराव शिर्के यांना पाच हजार सैन्यासह रायगडावर पाचारण केले.

संभाजीराजे ३ जून १६८० रोजी प्रतापगडावर आले. भवानीदेवीचे दर्शन घेऊन पूजा केली आणि त्यानंतर रायगडावर आले. त्यांचे सासरे पिलाजीराव शिर्के पाच हजार सैन्यासह रायगडावर येऊन दाखल झाले होते. संभाजीराजांनाी किल्ल्याच्या सर्व चौक्यांवर खबरदारांना नेमले आणि बंदोबस्त केला. अतिशय संघर्षमय वातावरणात संभाजीराजांनी रागयडाच्या कारभाराची सूत्रे हाती घेतली (१८ जून १६८०).

संभाजीराजांनी पुन्हा शिवाजी महाराजांचे क्रियाकर्म करून दानधर्म केला आणि २० जुलै १६८० रोजी मंचकारोहण विधी पार पाडला.



संभाजीराजांनी जाणतेपणाने सर्व विधी करवून घेतले आणि १६ जानेवारी १६८१ या दिवशी राज्याभिषेक करवून घेतला. त्यापूर्वी त्यांचा येसूबाईंशी समंत्रकविवाह संपन्न झाला. वाटेत आलेल्या अनंत अडचणींना तोंड देत आपल्या पतीचा राज्याभिषेक सोहळा झाल्याचे पाहून येसूबाईंना अत्यानंद झाला.

संभाजीराजांनी राज्याभिषेकानंतर लगेचच कारभाराची सूत्रे हातात घेतली आणि नंतर दोन मोहीमा फत्ते केल्या. एक होती बुऱ्हाणपूरची. २० जानेवारी १६८१ ला बुऱ्हाणपूर लुटून अगणित संपत्ती हस्तगत केली. पुढे फेब्रुवारी १६८१ मध्ये औरंगाबादवर चाल करून मराठ्यांची एक तुकडी घुसवली. इथेही भरपूर लूट जमा केली. औरंगाबाद ही औरंगजेबच्या दक्षिण सुभ्याची राजधानी होती. अशाप्रकारे बुऱ्हाणपूर आणि औरंगाबाद लुटून संभाजीराजे मोगलांवर दहशत निर्माण करण्यात यशस्वी झाले.

औरंगजेबाचा पुत्र शहजादा अकबर बापाशी भांडून रजपूतांना मिळाला होता. तो जीवाच्या भीतीने महाराष्ट्रात आला. संभाजीराजांनी

त्याला आश्रय दिला. त्याच्याबरोबर त्याचा दिवाण दुर्गादास राठोड होता. कवी कलश हा संभाजीराजांचा खास मित्र झाला होता. त्याने अकबराशी मैत्री केली. संभाजीराजांना मंत्रीमंडळातील अण्णाजी दत्तो, बाळाजी आवजी आणि हिरोजी फर्जद यांनी कारस्थान रचल्याचे कळले. संभाजीराजांना ठार मारून राजारामाला गादीवर बसवण्याची त्यांची योजना होती. ही मसलत अकबर आणि दुर्गादास मार्फत संभाजीराजेंपर्यंत पोचली. संभाजीराजे अत्यंत संतापले आणि त्यांनी रागाच्या भरात आप्पाजी दत्तो, त्यांचे बंधू सोमाजी दत्तो, बाळाजी आवजी, शामजी आवजी आणि हिरोजी फर्जद यांना हत्तीच्या पायी दिले.

महाराणी येसूबाईंना बाळाजी आवजींना मारलेली गोष्ट आवडली नाही. त्यांनी त्याविषयी संभाजीराजांशी बोलणे केले. येसूबाई म्हणाल्या, ''बाळाजी आवजींनी काही अपराध केलेला नाही. कुणाच्या तरी सांगण्यावरून ही गोष्ट आपण का केलीत? अशाने पुढे राज्य कसे चालेल?'' त्यावर राजे उत्तरले, ''आमच्याही मनात ही गोष्ट नव्हती. परंतु रागाच्या भरात घडले खरे.'' पुढे संभाजीराजांनी येसूबाईंना आवजींच्या दोन पुत्रांना चाकरीत ठेवून त्यांच्या कुटुंबाचा बंदोबस्त करावा असे सुचवले.

येसूबाईंनी त्यांचे दोन मुलगे खंडोबल्लाळ व निळोबल्लाळ यांना पुत्रवत सांभाळले व त्यांचे रक्षण केले. पुढे खंडोबल्लाळ याने संभाजीराजे व राजाराम महाराज यांची अतिशय निष्ठेने सेवा केली आणि सर्वांची मने जिंकली. इतिहासात स्वामीनिष्ठ म्हणून त्यांने नाव अमर झाले.

या उदाहरणावरून येसूबाईंचे संभाजीराजांच्या राज्यकारभारावर जिजामाता-प्रमाणे बारीक लक्ष होते आणि त्यातून त्यांचा मनाचा मोठेपणा आणि माणसे ओळखण्याचे कसब ध्यानी येते.

शिवाजी महाराज ज्याप्रकारे आपले शिक्के जिजामातांकडे ठेवीत होते त्याचप्रमाणे संभाजीराजे येसूबाईंकडे राज्यकारभाराचे शिक्के ठेवीत होते. त्याचा उल्लेख बखरीत आढळतो. ‘श्री सखी राज्ञी जयति’ असा येसूबाईंचा शिक्का होता आणि त्या मुद्रेचे एक पत्र उपलब्ध आहे. यावरून महाराणी येसूबाई संभाजीराजांच्या राज्यकारभारात केवळ लक्ष देत नव्हत्या तर त्यांना मदतसुद्धा करीत होत्या असे दिसते.

संभाजीराजांना आपल्या नऊ वर्षांच्या कारकीर्दीत (१६८१ ते १६८९) सिद्दी, पोर्तुगीज आणि मोगल यांच्याशी संघर्ष करावा लागला. मोगल बादशहा औरंगजेबाने सिद्दीला हाताशी धरून त्याला संभाजीवर चाल करून पाठवले. सिद्दीने पनवेलपासून चौलपर्यंतचा किनाऱ्याचा प्रदेश उद्‌ध्वस्त केला (डिसेंबर १६८१). त्यावर संभाजीराजांनी खुष्कीच्या व समुद्रमार्गाने सिद्दीवर चाल केली. त्यावेळी पोर्तुगीजांनी समुद्रमार्गाने मोगली आरमाराच्या साहाय्याने संभाजीवर चाल केली. सिद्दी, इंग्रज व पोर्तुगीज एकाचवेळी मोगलांच्या साहाय्याने संभाजीराजावर तुटून पडले होते. औरंगाबादहून बहादूरशहा हा सुद्धा संभाजीवर चाल करून आला. त्यामुळे नाईलाज होऊन सिद्दीवरील मोहीम संभाजीराजांना अर्धवट सोडावी लागली आणि राजे औरंगजेबाकडे वळले.

प्रारंभी पोर्तुगीजांची इच्छा संभाजीबरोबर वैर वाढवण्याची नव्हती. २८ जुलै १६८३ला संभाजीराजांना पुत्रलाभ झाला तेव्हा पोर्तुगीजच्या गव्हर्नर फ्रान्सिक राव्होटा याने अभिनंदनाचे पत्र पाठवले होते. पुढे मालांच्या ये-जा करण्यावरून कुरबुरी वाढत गेल्या आणि त्यांना मोगलांचा पाठिंबा मिळाला. त्यामुळे मराठे-पोर्तुगीजकडील संघर्ष चिघळत गेला. पुढे फोंड्याच्या मजबुतीवरून संभाजीराजांनी गोव्यावर चाल करण्याची तयारी केली. त्यावेळच्या त्यांच्या तयारीने व जिद्दीने गोवेकर भयभीत झाले होते. यावेळी मराठ्यांवर शहाअलम चाल करून येत असल्याचे कळले आणि ही मोहीम संभाजीराजांना रद्द



करावी लागली. फेब्रुवारी १६८४ मध्ये राजांनी पोर्तुगीजांशी तह केला आणि आपली जरब बसवली.

मोगलांबरोबरचा संभाजीराजांचा संघर्ष मात्र अखंड नऊ वर्षे सुरू होता आणि तो अनेक आघाड्यांवर सुरू होता. शिवाजी महाराजांच्या निधनानंतर औरंगजेब आपले प्रचंड सैन्य, अनुभवी सेनानी आणि आप्तेष्ट या सगळ्यांना घेऊन दक्षिणेत संभाजीबरोबर दोन हात करण्यास उतरला होता.

कल्याण, औरंगाबाद, चांदा, बेंदर फलटण व रायगड या सर्व भागांत संभाजीराजांनी औरंगजेब आणि त्याच्या प्रचंड सैन्याबरोबर वर्षभर लढा दिला. १६८८ साली पावसाळा संपल्यानंतर मोगलांची सेना आणि मराठ्यांची फौज युद्धाला भिडणार होती. त्याच सुमारास मराठेशाहीत शिर्के यांचे बंड उपस्थित झाले. त्याला कारण ठरले संभाजीराजांचा जिवलग कवी मित्र कलश.

संभाजीराजांचा कारभार कवी कलशाच्या तंत्राने चालला होता. शिवाजी महाराजांनी राघोजी (पिलाजीराव शिर्के यांचा मुलगा) हा पुत्र

झाल्यावर देशमुखी देऊ असे कबूल केले होते. राघोजीला पुत्र होऊनही संभाजीने वतन देण्यास नकार दिला. यामागे कवी कलशाचा हात असावा अशी गणोजी शिर्के यांची खात्री पटली. त्यामुळे बरीच शिर्के मंडळी औरंगजेबाला मिळाली.

कवी कलशासारख्या परक्या, अत्यंत कवडीमोलाच्या कनिष्ठ माणसाकडून शिर्के यांसारखे एक मातब्बर घराणे दुखावले गेले, अपमानीत झाले. मैत्रीपुढे संभाजीराजे हतबल झाले होते. कदाचित कवी कलश करीत असलेल्या हिडीस अनुष्टानाचा हा प्रभाव असावा.

कवी कलशामुळे येसूबाईंच्या माहेरच्या माणसांशी संभाजीराजांचे मतभेद टोकाला गेले आणि येसूबाईंच्या माहेरची सगळी मंडळी औरंगजेबाच्या सेवेत दाखल झाली.

संभाजीराजे कवी कलशासह रायगडास जाण्यासाठी संगमेश्वरला गेले (१ फेब्रुवारी १६८९) २ फेब्रुवारीला शेखनिजाम कोल्हापूरहून निघाला आणि त्याने ३ फेब्रुवारी या दिवशी संभाजीवर झडप घालून त्यांना कैद केले.

त्यावेळी महाराणी येसूबाई रायगडावर होत्या. त्यांना ही गोष्ट समजली. संभाजीराजांची दुसरी पत्नी दुर्गाबाई त्यांच्या मुलीसह बहादूरगडावर कैदेत होत्या.

संभाजी आणि कलश यांना पकडल्यानंतर बादशहा औरंगजेबाने संगमेश्वरला लष्करी ठाणे स्थापन केले. संभाजीराजे व कवी कलश यांना बेड्या घालून आणण्यात आले. संभाजीराजांची लष्करातून धिंड काढून फिरवण्यात आले. मोगल बादशहाने त्यांचे हालहाल केले पण संभाजीच्या तोंडी निराशेचा उद्‌गार नव्हता, त्याने बादशहापुढे मान वाकवली नाही.

मरणाला संभाजीराजे धीरोदात्तपणे सामोरे गेले.

■

# ५. संभाजीराजांच्या वधानंतर

संभाजीराजे यांना ३ फेब्रुवारी १६८९ रोजी संगमेश्वरात मोगलांनी कपटाने कैद केले आणि त्यांचा क्रूर वध केला. ही बातमी रायगडावर पोचली आणि तेथील सर्व कर्त्या मंडळींचा नूर पालटला. त्यावेळी संभाजीराजांचा सावत्र भाऊ राजाराम हा तिथे नजरकैदेत होता. रायगडाचा मुख्याधिकारी येसाजी कंक याच्या आदेशावरून रायगडाचा किल्लेदार चांगोशी काटकर याने राजाराम राजे यांची सुटका केली. त्यानां मराठ्यांचा राजा म्हणून जाहीर करण्याचे ठरले. संभाजीराजांच्या



पत्नी येसूबाई यांची याला संमती होती. संभाजीचा पुत्र शिवाजी राजे (शाहू) त्यावेळी रायगडावर येसूबाईंबरोबर होता आणि मराठ्यांचा राजा म्हणून या पुत्राचा त्यावर हक्क होता. परंतु येसूबाई खूप विचारी होत्या. तिने याप्रसंगी धीरोदत्तपणा व मनाचा मोठेपणा दाखवून रायगडावरील सर्व कारभाऱ्यांना सूज्ञ सल्ला दिला. राजारामाचे वय होते १९ वर्षे तर शाहू होता केवळ ७ वर्षांचा. शाहू लहान असल्यामुळे राजारामाने राज्य प्रतिनिधी म्हणून राज्य कारभार पाहावा हे योग्य ठरेल असा विचार येसूबाईंच्या मनात आला. महाराणी येसूबाईंवर दुःखाचा डोंगर कोसळला असताही तिने मन सावरले. संभाजीराजांच्या क्रूर वधाने रायगडावरची कर्ती मंडळी अत्यंत शोकाकूल झाली होती. संभाजीराजांच्या राज्याभिषेकानंतर राज्याची घडी बसविण्याचा प्रयत्न होत असतानाच मराठेशाहीवर हा घाला झाला होता. विशेषतः शिवाजी महाराजांनी स्थापन केलेल्या हिंदवी स्वराज्यावर मोठे संकट आले होते. महाराणी येसूबाईंनी आपले वैयक्तिक दुःख आवरून या संकटातून मोठ्या धैर्याने मार्ग काढला.

स्वतःचे दुःख बाजूला ठेवून येसूबाईंनी कंबर कसली. स्वराज्याच्या हितासाठी तिने रायगडावरील प्रधान मंडळी, मुत्सद्दी आणि सरदार यांना रायगडावर चर्चेसाठी एकत्र बोलावले. जमलेल्या मंडळींमध्ये निराजी आवजी, जनार्दन हनमंत, खंडो बल्लाळ, चिटणीस आणि रामचंद्रपंत बोरीकर यांच्यासारखी मुत्सद्दी मंडळी होती. तसेच महादजी नाईक, पानसंबळ, संभाजी घोरपडे, धनाजी जाधव, खंडेराव दाभाडे यांसारखे शूर सरदार होते. येसूबाई राजमाता जिजाबाई आणि शिवाजी महाराज यांचे डावपेच पाहून मोठी झाली होती. स्वराज्याच्या या कठीण प्रसंगीसुद्धा तिने अतिशय शहाणपणाने, विचारपूर्वक आणि दूरदर्शीपणाने विवेक सांभाळून निर्णय घेतला. तिने जमलेल्या सर्व अनुभवी व जाणत्या मंडळींना तिचा निर्णय सांगितला. ती म्हणाली,

''माझा मुलगा शिवाजी (शाहू) याचा राज्यावर खरा हक्क आहे. मात्र आज तो लहान आहे, अज्ञान आहे. त्याच्याकडून राज्याचा कारभार केला जाणार नाही. या कारणासाठी तो प्रौढ होईपर्यंत राजारामानं राजप्रतिनिधी म्हणून राज्यकारभार चालवावा.'' तिने आणखी एक गोष्ट सर्वांना निक्षून सांगितली आणि ती म्हणजे रायगडावर शत्रू मोगलांनी हल्ला केला आहे. त्यांच्या हाती स्वराज्याचे दोन्ही वारस सापडले तर ती मोठी चूक ठरेल. मोगल बादशहाला जे हवे ते घडेल आणि म्हणून राजाराम व शाहू हे राज्याचे दोन वारस एकत्र सापडू नयेत तसेच मोगलांचे लक्ष रायगडावर केंद्रीत होऊ नये म्हणून राजारामाचे रागयडाबाहेर पडावे आणि बाहेरून राज्याचे रक्षण करावे.

२५ मार्च १६८९ या दिवशी मोगल बादशहा औरंगजेब याच्या आज्ञेप्रमाणे झुल्फिकार खान या मोगल सरदाराने रायगडाला वेढा घातला. वेढा दिवसेंदिवस कडक होऊ लागला. रायगड किल्ला मोगलांच्या हाती पडण्यापूर्वीच राजारामाने वैराग्याचा वेष केला आणि तो किल्ला सोडून प्रतापगडावर गेला (५ एप्रिल १६८९) संभाजीची पत्नी व मुलगा रागयडावर आहेत हे बादशहा औरंगजेबास कळले होते आणि म्हणून त्याने सरदार झुल्फिकार खानाला रायगडावर हल्ला करून सर्वांना पकडून कैद करावे असा हुकूम दिला होता. जवळपास दहा महिने मोगलांच्या हल्ल्याला मराठ्यांची सेना दाद लागू देत नव्हती. तेव्हा झुल्फिकार खानाने आपल्या मदतीला कोकणातून जंजिराच्या हबशीस बोलावून घेतले. किल्ला मोठ्या शर्थीने लढवला जात होता.

शेवटी रायगडावरील मराठी मुत्सद्द्यांपुढे वाटाघाटी शिवाय दुसरा मार्ग उरला नाही. सरदार झुल्फिकार खानाच्या सैन्यात मराठ्यांविषयी माहीतगार असलेल्या माणसाच्या मध्यस्थीने वाटाघाटी होणे आवश्यक होते. सरदारने त्यासाठी सूर्याजी पिसाळ यास नेमले.

झुल्फिकार खानाने मध्यस्थांच्या मार्फत किल्ल्यातील मंडळींना

कळवले की, ''तुमचा सरदार राजाराम आणि त्याचे इतर साथीदार तुम्हाला सोडून गेले आहेत तेव्हा तुम्हाला तिकडून मदत येणार नाही हे निश्चित. कदाचित तुम्हाला कुणी मदत पाठवण्याचा प्रयत्न केलाच तर त्याचा तुम्हाला फारसा उपयोग होईल असे वाटत नाही. शिवाय बादशहाची बेगमसाहेब यांचे असे म्हणणे आहे की लहान शिवाजी (शाहू) याला ती आपल्या पुत्राप्रमाणे मानते आणि संभाजीच्या कुटुंबाला त्यांच्या कुटुंबातील माणसांचा दर्जा देऊन सहानुभूतीने वागण्याचा तिने निश्चय केला आहे आणि बादशहा औरंगजेब याचे त्याला पूर्ण समर्थन आहे.''

किल्ल्यातील लोकांची स्थिती दिवसेंदिवस कठीण होत चालली होती. किल्ला मोगलांच्या हाती देण्यावाचून आता दुसरा मार्ग ज्येष्ठ मंडळींना दिसत नव्हता. परत एकदा येसूबाईंनी रायगडावरील सर्व अधिकारी मंडळींना एकत्र बोलावले आणि चर्चा करून सांगितले की, ''आपण अजूनही उशीर केला आणि किल्ला बादशहाच्या हवाली केला नाही तर हिंदू धर्माचा द्वेष्टा बादशहा कट्टर मुसलमान असल्यामुळे आपल्या सर्वांचे काय करील व आपणावर काय अनर्थ कोसळेल हे सांगता येत नाही. या कठीण प्राप्त परिस्थितीत आपण डोके शांत आणि मन स्थिर ठेवून बादशहा आणि त्याची बेगम यांच्या बोलण्यावर विश्वास ठेवू या आणि दैवावर हवाला ठेवून किल्ला मोगलांच्या हवाली करावा हे इष्ट वाटते.''

अखेर सर्वांना रायगड सोडावा लागला. येसूबाई आणि पुत्र शिवाजी राजे यांना कैद पत्करावी लागली.

किल्ला फत्ते झाल्याची बातमी झुल्फिकार खानाने बादशहाला कळविली (१९.१०.१६८९). बादशहाला रायगड किल्ला सर झाल्याची बातमी कळून आनंद झाला. त्याने रायगडचे नाव इस्लामगड असे केले.

■

## ६. येसूबाई मोगलांच्या कैदेत

संभाजीची बायको-मुलं यांना बरोबर घेऊन यावे अशी आज्ञा बादशहाने सरदार झुल्फिकार खान यास केली. त्याने संभाजीचा मुलगा शिवाजी, दासीपुत्र मदनसिंग व माधवसिंग, संभाजीची बायको येसूबाई, आई आणि इतर मंडळी यांना बरोबर घेतले आणि बादशहाकडे भेटीस गुलालबार (बादशहाची छावणी) येथे आला. त्या सर्वांची व्यवस्था तंबूत करण्यात आली. बादशहाने संभाजीच्या मुलांना त्यांच्या योग्यतेप्रमाणे राजाची पदवी, मन्सबी, हत्ती-घोडे इ. सरंजाम दिला.



बादशहाने शिवाजीस सप्तहजारी केले आणि त्याचे नाव शाहू राजे असे केले. त्याला राजा ही पदवी देण्यात आली. त्याची सरंजामी व्यवस्था करण्यासाठी अधिकारी नेमून देण्यात आले. त्यांना चांगले शिक्षण देण्यात यावे अशी आज्ञा केली. संभाजीची आई आणि बायको यांना उंची वस्त्रे आणि रत्नाचे अलंकार देण्यात आले. मुलांनी आपली आई व आजी यांच्या पाशी राहावे अशी आज्ञा करण्यात आली. त्या सर्वांचा खर्च व्यवस्थितपणे चालावा म्हणून बादशहातर्फे कारभारी नेमण्यात आले.

संभाजीचे खेळोजी, रामाजी, जानोशी आणि इतर सरदार मोगल छावण्यात आले होते. त्यांनाही बादशहाने त्यांच्या त्यांच्या योग्यतेप्रमाणे मन्सबी आणि इतर सरंजाम दिले.

त्यानंतर बादशहाच्या मुक्कामाबरोबर येसूबाई व इतरांचा मुक्काम हलत होता. बादशहाची छावणी विजापूरला आली आणि बद्री नावाच्या कृष्णा नदीवरील खेड्यात पोचली. याच सुमारास येसूबाई यांना बादशहाने अक्कलकोट, इंदापूर, सुपे, बारामती या परगण्यांची जहागीर करून दिली.

एका इटालियन प्रवाशानी गलगती या गावी बादशहाची भेट घेतली होती. त्यानी त्या प्रवासाचे वर्णन केले. त्यात त्याने बादशहाच्या छावणीच्या विराट स्वरूपाचे वर्णन केले आहे. वृद्ध बादशहाच्या सहवासात संभाजी उर्फ शाहू वाढत होता. येसूबाईला सुद्धा त्याचे दर्शन घडत होते. बादशहाच्या सर्व प्रवासात येसूबाई व शाहू राजे यांना बादशहाबरोबर राहावे लागायचे. जत्रा स्वरूपी छावण्यांबरोबर त्यांचा प्रवास मेण्यातून होई आणि बरोबरीचा जनानखाना हा मेण्यातून व अंबारीतून प्रवास करी.

राजाराम महाराज आपल्यापरिने बाहेरून प्रयत्न करीत होते. दक्षिणेतील जिंजीहून ते महाराष्ट्रात आले. विशालगडाहून त्यांनी

सातारच्या किल्ल्यावर प्रयाण केले (ऑक्टोबर १६९९). औरंगजेबाने सातारा किल्ल्यावर आपली नजर वळवली. मराठे सातारच्या किल्ल्यावर पराक्रमाची पराकाष्ठा करीत होते. किल्ला हाती येण्याची चिन्हे दिसत नव्हती. यावेळी राजाराम महाराज सिंहगडावर पोचले होते. तिथे ते अकस्मात आजारी पडले आणि तिथे त्यांचा दुर्दैवाने देवाज्ञा झाली. (२० मार्च १७००).

राजाराम महाराजांच्या मृत्यूची खबर शाहूराजेला कळली आणि त्याला अतोनात दुःख झाले. त्याला एक आशा होती की, केव्हा ना केव्हा राजाराम आपली या कैदेतून सुटका करील; परंतु त्यांच्या या अचानक उद्भवलेल्या मृत्युमुळे ती आशा संपली होती. आता आपण शेवटपर्यंत मोगलांच्या अटकेत राहणार आणि अशा दुःस्थितीतच आपला शेवट होणार असे वाईट विचार त्याच्या मनात थैमान घालू लागले. शेवटी त्याला ताप आला नि त्याचे चित्त सैरभैर झाले. ताप दिवसेंदिवस वाढत होता. येसूबाई व बेगमसाहेब फार घाबरून गेल्या. बेगम शाहूवर पुत्रवत प्रेम करीत होती. ती बिछाना सोडत नव्हती आणि आपल्या मुलाला लवकर गुण यावा म्हणून रात्रंदिवस अल्लाची करूणा करू लागली. जेव्हा ही गोष्ट बादशहाला कळली तेव्हा त्यालाही खूप वाईट वाटले आणि तो शाहूच्या समाचारास गेला.

बादशहाने एकदा शाहू याला मुसलमान करण्याचा प्रयत्न केला. १७०३ मध्ये मोहरमच्या दिवशी त्याने आपला सरदार बहादूर याला आज्ञा केली आणि सांगितले की, संभाजीचा मुलगा राजा शाहू हा आमच्या कैदेत आहे त्याला बोलवा आणि त्याला म्हणा, 'तू मुसलमान हो' त्याप्रमाणे बहादूर शाहूला बोलला पण त्याने ते मान्य केले नाही. शाहूने मोठा धडाडीचा निर्णय घेतला होता कारण शाहू राजाने धर्मांतर केले असते तर महाराष्ट्राचा संपूर्ण इतिहास बदलला असता आणि एवढा मोठा निर्णय शाहू राजांनी आपली आई येसूबाईंच्या सल्ल्याशिवाय

करणे शक्य नव्हते.

शाहूच्या निर्धाराची ही बाब महाराष्ट्राच्या इतिहासातील एक महान घटना म्हणून पाहायला हवी आणि या निर्धाराच्या मागे आपल्याला जाणवते ते महाराणी येसूबाईंचे प्रखर व्यक्तिमत्त्व.

येसूबाईंच्या रूपाने प्रत्यक्ष अंबाभवानीने त्या काळात शाहूला आणि पर्यायाने महाराष्ट्राचा धर्म वाचविला असे म्हटल्यास ते वावगे ठरणार नाही.

एकूण या घटनेकडे पाहता असे नक्की म्हणता येते की, येसूबाईंनी आपल्या पारंपरिक हिंदू संस्कारांपासून पुत्र शाहूराजांना दूर होऊ दिले नाही. त्यांच्या मनात हिंदुत्वनिष्ठा सतत जागृत ठेवली आणि शाहूराजांचे धर्मांतर टळले. ही मराठ्यांच्या इतिहासातील अत्यंत महत्त्वाची घटना आहे आणि त्याचे सर्व श्रेय महाराणी येसूबाईंच्या सूज्ञ व दूरदृष्टीच्या विचारांना जाते.

बादशहा औरंगजेब युद्ध मोहिमांचा अतिरेक करीत होता आणि त्याच्या या अतिरेकाला पुण्याच्या मुक्कामातच त्याचे अधिकारी व सैनिक कंटाळले होते. त्याने मोहिमा थांबवाव्या यासाठी त्याचा धाकटा मलगा कामवक्ष याने प्रयत्न केले पण त्यात त्याला यश आले नाही.

औरंगजेब बादशहा ८८ वर्षांचा झाला आणि त्याला वृद्ध अवस्था प्राप्त झाली, त्याच्या उर्मीला ओहोटी लागली आणि ती वैफल्याच्या दिशेने वाटचाल करू लागली. त्याचे टोचणारे मन त्याला म्हणत होते की, मराठ्यांचे राजकुटुंब हाती लागूनसुद्धा राजारामाच्या पत्नी ताराबाईसारख्या स्वयंप्रकाशी रणरागिणीने नेतृत्व दिले आणि मराठी सोबत्यांच्या साहाय्याने त्याची झोप उडवली होती. १७०६ मध्ये आपला सरदार झुल्फिकार खान यास लिहिलेल्या एका पत्रात त्याने आपली मनःस्थिती कळवली.

मराठ्यांनी कोंडाणा उर्फ सिंहगड सर केल्याची बातमी बादशहाला

कळली (२१ मार्च १७०६) आणि त्याचा जीव धायकुतीला आला, तो अस्वस्थ झाला.

अहमदनगरजवळच्या वाकीनखेडे येथील मोहिमेनंतर देवापूरास आल्यावर बादशहाची तब्येत अधिक ढासळली. त्यावेळी त्याच्याजवळ त्याची पत्नी उदेपुरी बेगम व झीनतुन्निसा बेगम होत्या. येसूबाईसुद्धा त्यांच्या आजारपणात तेथे होत्या. झीनतच्या प्रेमळ स्वभावामुळे आणि येसूबाईंच्या सात्विक वृत्तीमुळे एक सैतान थंड पडत चालला होता आणि त्याची अखेरची सफर सुरू झाली होती.

भिंगार (अहमदनगरजवळ)च्या छावणीत बादशहा आजारी पडला आणि शुक्रवारी २८ फेब्रुवारी १७०७ या दिवशी बादशहा औरंगजेब पैगंबरवासी झाला.

इ.स. १६८१ मध्ये (शिवाजी महाराजांच्या मृत्यूनंतर) औरंगजेब अजमेरहून मोठ्या आशा मनात ठेवून निघाला होता आणि महाराष्ट्राच्या मोहिमेवर आला होता. मराठेशाही संपवण्यात त्याला अपयश आले आणि २६ वर्षांनी त्याचा महाराष्ट्रातच अंत झाला.

छ. संभाजीराजांचे हौतात्म्य आणि त्यांच्या कुटुंबास मिळालेला कारावास यामुळे मराठी मने पुन्हा चेतवली गेली यात शंका नाही. औरंगजेब त्यांच्याशी लढत राहिला, मोहिमा करीत राहिला परंतु त्याला पाहिजे तसे यश काही लाभले नाही.

संभाजीराजांच्या कुटुंबियांना कैद केल्यानंतर त्यांना औरंगजेबाने अगदी वाईट वागणूक दिली नाही, त्यांच्यावर कुठले अत्याचार केले नाहीत वा कुणाचा दुष्ट अंतही घडवला नाही. खरं म्हणजे हे करणे त्याला सहज शक्य होते. मग असे का घडले नाही? तर असे वाटते की औरंगजेब अनुभवी व धूर्त होता. कपटी होता पण हुषारही होता. रयतेची नस तो ओळखू शकत होता त्यामुळेच त्याने शाहूराजांना आणि येसूबाईंना फक्त आपल्या ताब्यात ठेवायचे, त्यांना मारायचे

नाही असा विचार केला. कदाचित तसे दुष्कर्म त्याच्या हातून घडले असते तर मराठ्यांना अधिक चेव येईल हे तो जाणून होता. मात्र त्याची ही चालसुद्धा चुकली. कारण पुढचा इतिहास हेच दाखवतो. राजाराम किल्ल्यावरून सहीसलामत सुटला होता, राजारामाला आपण सहज कैद करू आणि ठार मारू असे त्याचे भाकीत होते. मात्र राजाराम महाराजांनी आपल्या स्थिर व शांत बुद्धीने अनुभवी सेनानी आणि मुत्सद्यांना हाताशी धरून पराक्रमाचे विविध रंग दाखवले आणि पूर्ण सावधपणे स्वराज्यास वाचवण्यात यशस्वी झाले.

राजाराम महाराजांच्या निधनानंतर त्यांची बायको, महाराणी ताराबाईने आपणही कमी नाही हे पराक्रम करून दाखवून दिले. ताराबाई स्वयंप्रकाशी वीजेच्या लोळाप्रमाणे औरंगजेबाच्या सैन्यापुढे उभी राहिली, त्याच्याशी चार हात करीत राहिली आणि शेवटी बादशहा औरंगजेबास नैराश्य आले आणि त्याचा अंत झाला.

बादशहाची कन्या झीनतुन्निसा उर्फ झीनत बेगम हिच्या प्रभावामुळे सुद्धा त्याने शाहूराजे आणि येसूबाई यांना उपद्रव पोहोचवला नसावा.

झीनतुन्निसा ही बादशहाची कन्या खूप ममताळू होती. तिने वडिलांची जन्मभर सेवा केली. त्यामुळे तिचा मोठा प्रभाव बादशहावर होता आणि या सुकन्येच्या गोड स्वभावाचा फायदा येसूबाईंसारख्या सोशिक स्त्रीने मोठ्या हुशारीने करून घेतला. शाहूराजांबद्दलही झीनत बेगमला ममत्व वाटत होते आणि त्याचे कारण शाहूराजांना ती आपला मुलगा मानत होती हे होते. शाहूराजा हा बेगम झिनतचा खूप लाडका होता. त्याचे संगोपन करण्यात तिचा मोठा वाटा होता. येसूबाई आणि शाहू राजे यांच्या सुरक्षिततेत झीनतच्या एकूण प्रेमळ स्वभावाचा मोठा वाटा होता यात शंका नाही.

■

# ७. शाहूराजे आणि येसूबाईंची सुटका

औरंगजेबाच्या मृत्यूनंतर शहाजादा आज्जम याने वडीलांचा दफनविधी उरकला आणि तो दिल्लीस आला. त्याने स्वतःस बादशहा म्हणून घोषित केले. शाहूराजांची बादशहा आज्जमबरोबर भेट सरदार झुल्फिकारखान याने करून दिली. आज्जमने शाहूचा गौरव केला. रजपूत सरदार आणि इतर काही मनसबदारांकरवी शाहू आज्जमशहाचे मन वळविण्यात यशस्वी झाला. अखेर झीनत बेगमच्या मध्यस्थीनंतर आज्जम शहा शाहूस सशर्त सोडण्यात तयार झाला. त्यात शाहूची आई येसूबाई, भाऊ व इतर बायका यांना मोगलांपाशी ओलीस म्हणून ठेवावे तसेच बादशहाच्या हुकूमात राहून जेव्हा गरज पडेल तेव्हा आपल्या फौजेनिशी मोगलाना मदत करावी अशा काही अटी होत्या.

आज्जम शहा मारला गेल्यानंतर गादीवर मुअज्जम बादशहा आला. या बादशहाने अगोदर झालेल्या कराराप्रमाणे शाहूला सोडण्यास तयारी दाखवली.

अशाप्रकारे शाहू राजे मोगलांचे मांडलिक होऊन मोगली मनसबदार म्हणून कैदेतून निसटले आणि महाराष्ट्रात पोचले (मे १७०७).

शाहू राजे प्रथम माळव्याला आले. तेथून बाहेर पडून खानदेशाहून अहमदनगरला पोचले. ताराबाई यांनी त्यांचा हक्क डावलला आणि शाहू राजांचा तिच्याशी म्हणजे प्रत्यक्ष काकीशी संघर्ष सुरू झाला. मराठी मने दुभंगली आणि दोन वेगळ्या फळ्या उभ्या राहिल्या.

या संघर्षामध्ये शाहू राजे साताऱ्यास आले आणि त्यांनी सातारा किल्ला जिंकून घेतला. १२ जानेवारी १७०८ रोजी शाहूनी स्वतःस राज्याभिषेक करून घेतला आणि आपले प्रधानमंडळ नियुक्त केले.

मराठी सरदारांनी ताराबाईंकडे पाठ फिरवली होती. त्याचे कारण ताराबाई स्वतः लढणारी असल्यामुळे ती कुणाचे कळसुत्रे बाहुले होणाऱ्यातली नव्हती. स्वयंभू होती. सरदारांना तिच्याजवळ जाण्यात अडचण वाटत होती तर शाहू हा नवा राजा होता. त्याला माणसांची गरज होती. दुसरे म्हणजे शाहू सर्वांना समजून घेणारा असल्यामुळे तो आपल्या प्रभावाखाली राहील अशी सरदारांना खात्री होती. त्यामुळे शाहू राजांकडे माणसे वळली. शिवाय त्याने सरदारांवर वतनांची खैरात केली होती. शाहू राजे सरदारांमध्ये लोकप्रिय होण्यास या बाबी पुरेशा होत्या.

नव्या मोगल बादशहाने शाहू राजांची सुटका करण्यासंदर्भात आणखी एक विचार त्यामागे असावा. तो म्हणजे शाहूची सुटका केल्यास मराठी राज्यात वारशासाठी भांडणे सुरू होतील. आणि झाले तसेच. राजाराम महाराजांच्या मृत्यूनंतर त्याची पहिली पत्नी ताराबाईने आपला पुत्र दुसरा शिवाजी याला गादीवर बसवला आणि स्वतः राज्यकारभार पाहू लागली होती. तर राजाराम महाराजांची दुसरी पत्नी राजसबाई हिने कोल्हापूरवर वर्चस्व स्थापून आपला मुलगा दुसरा संभाजी याला गादीवर बसवून सत्ता स्थापन केली होती. आता मराठी राज्याचे तीन वारस झाले होते. राजारामला ताराबाईपासून झालेला शिवाजी (दुसरा), राजसबाईचा संभाजी (दुसरा) आणि येसूबाईचा शाहू. या

सगळ्या गदारोळाचे येसूबाईला काहीच माहीत नव्हते. कारण ती त्यावेळी महाराष्ट्रापासून हजारो मैल दूर मोगलाच्या कैदेत होती.

येसूबाई आणि तिच्याबरोबरीत इतर मंडळींना नव्या मोगल बादशहाबरोबर दिल्लीस जावे लागले होते. दिल्लीत त्यांची व्यवस्था लाल किल्ल्यात केली होती. झीनत बेगमही त्यांच्याबरोबर दिल्लीस गेली होती. त्यामुळे तिनं त्या सर्वांच्या व्यवस्थेची नीट काळजी घेतली. आपला मुलगा शाहू साताऱ्यात राज्याधिकारी झाला, त्याचे तिथे उत्तम बस्तान बसले इत्यादी गोष्टी येसूबाईंच्या कानावर येत होत्या आणि त्याचा त्यांना अतिशय आनंद होत होता.

गेली अनेक वर्षे महाराष्ट्राच्या सह्याद्रीच्या परिसरातील अनेक गावांमधून त्यांना औरंगजेबाच्या छावणीबरोबर भटकावे लागले होते. पाऊस-थंडी वारा नि ऊन या सगळ्याचा मारा सर्वांनी आनंदाने सहन केला होता. मात्र हे सगळे घडले तेव्हा ते आपल्या मुलखात म्हणजे महाराष्ट्रात होते. आता त्यांना बादशहाबरोबर दिल्लीला जावे लागले होते. त्या दिल्लीला गेल्या त्या ऐन उन्हाळ्यात, मे महिन्यामध्ये. तिथला कडक उन्हाचा त्यांना त्रास सहन करावा लागला असणार. रायगडच्या थंड हवेत महालात ऐषोआरामात राहणारी ही मराठ्यांची महाराणी आपल्या ध्येयासाठी लाल किल्ल्यात राहू लागते, तिथला उन्हाळ्याचा आगडोंब सहन करते आणि त्यात वर पुत्राचा वियोग सहन करीत कैदेत दिवस काढते. वेगळी भाषा, वेगळी संस्कृती, वेगळा धर्म, त्यांच्या वेगळ्या चालीरीती. या सगळ्यामध्ये त्या राणीला काय वेदना सहन कराव्या लागल्या असतील याची कल्पना करवत नाही. विचार करताना मन सुन्न होते, बेचैन होते.

पुत्र शाहूराजांकडून आपल्या सुटकेचे नक्की प्रयत्न होतील या आशेवर येसूबाई जगत होत्या आणि झालेही तसेच.

शाहूराजेंनी आपली आई येसूबाई आणि इतरांच्या सुटकेसाठी

अनेकांना लिहिले.

हुसेन अली मार्फत शाहू आणि बादशहा यांच्यात एक तह ठरला आणि तहामध्ये करार झाला (इ.स. १७१८). हा चौथाईचा करार म्हणून ओळखला जातो. या कराराच्या एका कलमामध्ये मराठ्यांनी दरसाल बादशहाला दहा लाखाची खंडणी द्यावी आणि शाहूची मातोश्री आणि इतर कुटुंबिय यांना सोडून स्वदेशी धाडावे असे ठरले.

या तहाची अंमलबाजावणी करून घेण्याकरिता बाळाजी विश्वनाथ दिल्लीस गेले. येसूबाई व इतर मंडळींना बाळाजीने ताब्यात घेतले. बाळाजींबरोबर येसूबाई, संभाजीराजांचा दासीपुत्र मदनसिंग आणि इतर मंडळी महाराष्ट्रात सातारला आली. तो दिवस होता ४ जुलै १७१९.

आपल्या मातोश्री येसूबाईंचे सातारला आगमन होताच शाहूराजांना अतिशय आनंद झाला.

शाहूराजांनी आपल्या राज्याची राजधानी साताऱ्यात शाहूनगर येथे केली होती.

१९ ऑक्टोबर १६८९ या दिवशी येसूबाई शाहूराजे समवेत गुलालबारमध्ये येऊन मोगल बादशहापुढे उभ्या राहिल्या. त्या दिवसापासून त्यांची कैद सुरू झाली होती. आता आपल्या प्रदेशात परत आल्या तो दिवस होता ४ जुलै १७१९ म्हणजे जवळपास तीस वर्षांनी त्या आपल्या राज्यात परतल्या होत्या. शत्रूच्या कैदेत राहून पारतंत्र भोगण्यापेक्षा मांडलिक राजा म्हणून का होईना स्वतंत्र कारभार करता येणं हे भाग्य आपल्या पुत्राला लाभले याचा एक माता म्हणून येसूबाईंना नक्की आनंद वाटत होता. छत्रपती शिवाजी महाराजांचा दृष्ट लागावा असा राज्याभिषेक सोहळा त्यांनी पाहिला होता. महाराज ज्या सिंहासनावर स्वतंत्र हिंदवी राज्याचा राजा म्हणून विराजमान झाले

तो क्षण आणि बत्तीस मण वजनाचे सुवर्ण सिंहासन त्यांनी पाहिले होते. शिवाजी महाराजांनंतर संभाजी राजांच्या त्या महाराणी झाल्या. संभाजीराजांचा राज्याभिषेक त्यांनी पाहिला. आणि त्याच देखण्या सुवर्ण सिंहासनावर त्यांना पट्टराणीपदाचा अभिषेक झाला होता. ते सगळे त्यांच्या नजरेसमोर होते.

मात्र स्वतःच्या पुत्राला लहानपणापासून दुर्दैवी दिवस पहावे लागले. रायगडचे सिंहासन तर त्याला प्राप्त झाले नाहीच, उलट मोगलांच्या कैदेत लहानाचे मोठे व्हावे लागले. हलाखीचे दिवस पाहावे लागले. खरं म्हणजे आपल्या पुत्रावर त्याच्या आजोबा व वडीलांप्रमाणे गुलाल उधळायला हवा होता. मात्र दुर्दैवाने ते घडले नाही. त्याला मोगलांच्या गुलताबादमध्ये दिवस कंठावे लागले. सातारच्या राज्यात आपला पुत्र शाहू राजेंना पूर्ण स्वातंत्र्य जरी नसले तरी मनसोक्त मनासारखे काम करता येते आणि आब राखून जनतेची सेवा करता येते हे पाहून आई म्हणून येसूबाई नक्की सुखावल्या होत्या.

दिल्लीहून आपल्या प्रदेशात परत आल्यानंतरचा काही काळ आपल्या महत्त्वाकांक्षी शूर मुलासह येसूबाईंनी खूप आनंदात घालवला. आपल्या आयुष्याचे आनंदाचे क्षण त्या उपभोगत होत्या. यावेळी येसूबाईंचे वय ६० वर्षे झाले होते. परंतु या वयातही तिने पुत्र शाहूराजांच्या राज्यकारभारात लक्ष घातले होते आणि त्यावेळी काही राजकीय व न्यायनिवाड्याची कामे त्यांनी केली होती. हे पेशवे दप्तरातील मजकूरावरून ध्यानात येते.

न्यायनिवाड्याची दोन उदाहरणे आहेत. एक म्हणजे कसबे कऱ्हाड येथील वेदभूषण रघुनाथभट सावलीकर हे पृथ्वी प्रदक्षिणा (हिंदुस्थानातील) करून आल्यानंतर त्यांनी त्यांना होन छ.२५ रबिलावल रु ९० असे वर्षासन दिले. हे वर्षासन २५ जानेवारी १७२० रोजी दिले. त्या पत्राचा मजकूर असा होता.

वेदमूर्तिजी पृथ्वी प्रदक्षणा करून आले.

नंतर मातोश्री आऊसाहेबी वर्षासन

करून दिल्हे जेणे प्रमाणे करार केले.

दुसरे उदाहरण आहे, येसूबाईंनी सरकारकुनांच्या कुटुंबातील तंटेही वडिलकीच्या नात्याने मिटवल्याचे. राजश्री नाटो शंकर गांडेकर आणि महादजी शंकर गांडेकर या पुत्रांमधला घरच्या वाटणी संदर्भातला हा वाद होता. कै. शंकरजी नारायण गांडेकर यांनी महादजी यांना दत्तकपुत्र म्हणून घेतले. पुढे त्यांना नारोपंत हा औरस पुत्र झाला. त्यानंतर त्या दोघांमध्ये घरच्या वाटणीविषयी वाद निर्माण झाला. हा वाद राजमाता येसूबाईं पुढे आला आणि त्यांनी त्याचा निवाडा केला, तो असा होता – ''दौलतीची वाटणी निम्मी निम्मी करून घ्यावी... उभयतांनी तंटा न करता एक विचारे चालावे आणि मातोश्रींच्या आज्ञेत राहून लौकिक राखावा.''

या निवाड्यात एकूम सात कलमें होती.

या निवाड्यांवरून येसूबाईंचा कारभारातील सहभाग लक्षात येतो.

येसूबाईंनी शाहूराजांना चांगले संस्कार करण्याबरोबर त्यांना धर्म आणि आपल्या धर्मातील देवदेवतांचे महत्त्व सांगितले होते आणि त्यांचे पाठपूजन करण्याचे शिक्षण दिले होते. मोगल बादशहाबरोबर मोगली छावणीत असतानासुद्धा त्यांनी हा क्रम चुकवला नाही आणि पुत्राच्या मनात धर्मयोग, स्वतःच्या देशाबद्दल प्रेम जागृत ठेवण्यात त्यांच्या या गोष्टी सहाय्यभूत ठरल्या. शाहूराजांवर झालेल्या या सुसंस्कारांमुळे बादशहाने जेव्हा त्यांना धर्मांतर करण्याचे सुचवले तेव्हा त्यांनी ठामपणे या प्रस्तावास नकार दिला. तसेच शाहूराजांचे बादशहाशी व इतर मोगल सरदारांबरोबरचे वागणे अतिशय सौजन्यशील, नम्र, विनयशील असे राहिले. त्यामुळे त्यांनी सर्वांची मने जिंकली होती आणि पर्यायाने औरंगजेब बादशहासुद्धा त्यांच्यावर धर्मांतरासाठी



बळजबरी करण्यास धजावला नाही. अर्थात शाहूराजांच्या या वागणूकीचे अंतिम श्रेय त्यांची माता म्हणून महाराणी येसूबाईंकडे जाते.

लहानपणी येसूबाई यांचे आपले पती संभाजीराजांबरोबर संस्कृत पंडितांकडे शिक्षण झाले होते. त्यांच्यावर राजमाता जिजाई आणि शिवाजी महाराज यांच्यासारख्या लोकोत्तर विभूतींचे सुसंस्कार घडले होते. येसूबाई सुविद्य आणि सुसंस्कृत होत्या. त्यामुळे संभाजी राजांच्या कारकिर्दीपासून ते पुत्र शाहूराजाच्या कारभारापर्यंत त्यांनी राजकीय, सामाजिक, धार्मिक असे सगळ्या प्रकारचे निर्णय योग्य तऱ्हेने घेतले असे दिसते आणि सर्वांनी त्यांची प्रशंसा केली होती.

महाराणी येसूबाई यांच्या जन्मतारखेची जशी निश्चित नोंद नाही, त्याचप्रमाणे त्यांच्या मृत्यूसंबंधीही निश्चित तारीख इतिहासकारांना सांगता आलेली नाही. त्यांच्या मृत्यूसंबंधी वारसा तहाचा दाखला देता येतो. शाहू राजे व कोल्हापूरचे संभाजीराजे (राजसबाईंचे पुत्र) यांचे वितुष्ट १७३१ पर्यंत होते. १७३१ मध्ये वारसा तह झाला आणि तेव्हापासून दोघांमध्ये प्रेमभाव निर्माण झाला. येसूबाईंच्या मृत्यूनंतर

शाहूराजांनी ही बातमी कोल्हापूरच्या संभाजीराजेंना कळवली. त्यावर संभाजीचे शाहूंना आलेले सांत्वनपर पत्र उपलब्ध आहे. त्यावरून महाराणी येसूबाईंचा मृत्यू १७३१ नंतर झाला असावा असे नक्की मानता येते.

येसूबाईंच्या मृत्यूनंतर त्याचा दफनविधी संगम माहुली येथे करण्यात आला. माहुली संगमावर महाराणी येसूबाईंच्या स्मृती प्रित्यर्थ वृंदावन आणि मेघडंबरी बांधण्यात आली. शाहूमहाराज तिथे दर्शनास जात आणि त्यांनी वृंदावनाच्या पूजा व्यवस्थेसाठी लोक ठेवले होते.

■

# ८. येसूबाईंच्या कार्याचा मागोवा

महाराणी येसूबाईंच्या कार्याचा मागोवा घेताना वा तिच्या कार्यावर दृष्टिक्षेप टाकताना तिच्या आयुष्यातील चार महत्त्वाचे टप्पे आणि त्या काळातील तिचे योगदान याचा विचार आवश्यक ठरतो. ते चार टप्पे असे –

अ. शिवाजी महाराजांच्या कारकीर्दीपासून ते त्यांच्या मृत्यूपर्यंत

ब. संभाजी राजांच्या उदयापासून ते त्यांच्या वधापर्यंत

क. संभाजीच्या वधानंतर ते मोगलाच्या कैदेपर्यंत

ड. मोगलांच्या कैदेतील दिवस ते कैदेतून सूटका

**अ. शिवाजी महारांची कारकीर्द आणि येसूबाई (१६६५ ते १६८०)**

संभाजीराजांची प्रथम पत्नी म्हणून येसूबाई पिलाजीराव शिर्के यांच्या घरातून जिजामातेच्या भोसले कुटुंबात आली (१६६५). येसूबाईना शिवाजी महाराजांचा सासरे म्हणून सहवास लाभला साधारण पंधरा वर्षे. म्हणजे महाराजांच्या मृत्यूपर्यंत (१६८०). या कालखंडातील सुखद गोष्ट म्हणजे शिवाजी महाराजांचे व्यक्तिमत्व या काळात अनेक

समर प्रसंगांतून गेले होते. आग्र्याला मोगल बादशहाच्या भेटीला गेले असता त्यांना व संभाजी राजांना झालेली नजरकैद, आग्र्याहून त्यांनी चातुर्याने करून घेतलेली सुटका, त्यांचा रायगडावर झालेला राज्याभिषेकाचा अनोखा सोहळा. त्यांच्या अनेक यशस्वी मोहिमा, केलेले तह, राजमाता जिजाईंचा मृत्यू. हे सारे येसूबाईंच्या समोर घडले होते. त्यातून तिचा आपले सासरे म्हणून महाराजांबद्दलचा आदर द्विगुणित झाला. आणखी एक बाब म्हणजे शिवाजी महाराजांचा आपल्या पुत्रावर एवढा विश्वास नव्हता मात्र स्नुषा म्हणून येसूबाईंवर दांडगा विश्वास होता. खरं म्हणजे कुटुंबातील तरुण स्त्रियांना त्याकाळी राजकारण वर्ज्यच असे. प्रसंगावत् पुढे काहींच्या बाबतीत घडले तरी जिजामाता हयात असताना येसूबाईंनी काही सल्ला देणं संभवत नाही. तरीसुद्धा आपल्या पुत्राच्या रागीट स्वभावामुळे महाराजांचे येसूबाईंशी सबंध कदाचित जवळचे निर्माण झाले असावेत आणि ते त्यांच्या अंगभूत गुणांवर शक्य झाले असेल. दुसरे म्हणजे हा कालखंड येसूबाईंच्या दृष्टीने प्रशिक्षण घेण्याचा होता. हे प्रशिक्षण घेतांना तिला महाराजांबरोबर जिजामातेचेही मार्गदर्शन मिळाले.

शिवाजी महाराजांनी स्वराज्य स्थापन करताना प्रत्येक पाऊल विचारपूर्वक आणि विशिष्ट हेतू मनात ठेवून टाकले होते. आपल्या कुटुंबात सूना आणताना व आपल्या घरच्या मुली बाहेर देताना ही दृष्टी ठेवली होती. पिलाजी शिर्के हे शृंगारपूरच्या सुर्वे यांचे कारभारी होते. शृंगारपूर आपल्या कब्ज्यात घेताना त्यांनी पिलाजी शिर्के यांना जवळ केले आणि त्यांची कन्या जिऊबाई (म्हणजेच लग्नानंतरच्या येसूबाई) हिचे लग्न आपल्या ज्येष्ठ मुलाशी संभाजीशी जुळवले. या संबंधातून ही दोन्ही घराणी जवळ आली आणि स्वराज्याच्या उभारणीत त्याचा फायदा झाला.

येसूबाईंबरोबर केशवभट आणि रघुनाथ पंडित हे दोघे विद्वान

शिवाजी महाराजांकडे आले. महाराजांनी रघुनाथ पंडितांकडे न्यायदानाची महत्त्वाची जबाबदारी दिली आणि केशवभटांची नेमणूक संभाजीराजांचे शिक्षक म्हणून केली. संभाजीराजांबरोबर येसूबाईसुद्धा त्यांच्याकडे शिक्षणाचे धडे घेत होत्या. प्रेमळ जिजामाता यांच्या आश्वासक छत्राखाली संभाजी मोठा होत होता, येसूबाईंनासुद्धा त्यांचे प्रेम मिळत होते. त्यावेळी शिवाजी महाराजांची स्वराज्या विषयीची कल्पना, स्वराज्यावरील तसेच आपल्या रयतेवरील उत्कट प्रेम आणि स्वराज्य स्थापनेचा त्यांनी घेतलेला ध्यास व त्यासाठी सोसत असलेले कष्ट, परिश्रम हे सगळे येसूबाईंच्या नजरेसमोर घडत होते. शिवाजी महाराजांचे बेरजेचे राजकारण, त्यातील बारकावे, कठिण परिस्थितीमध्ये त्यांनी घेतलेले निर्णय या सगळ्याचा परिणाम येसूबाईंच्या कोवळ्या मनावर होत होता आणि त्यांचे विचारी मन प्रगल्भ होत होते. शिवाजी महाराजांची राजनीति तिने आत्मसात केली होती. त्याचेच प्रतिबिंब तिने रायगडावर मोगलांनी वेढा घातला त्यावेळी घेतलेल्या निर्णयात दिसते.

शिवाजी महाराजांचा पुत्र संभाजीपेक्षा, येसूबाईंवर अधिक विश्वास होता या अनुमानाला बळकटी देणाऱ्या काही घटना आहेत. जिजाबाईंच्या मृत्यूनंतर संभाजीचे महाराजांबरोबर काही बाबतीत खटके उडू लागले. तसेच अष्टप्रधानांशी त्याचे जमत नव्हते. अशावेळी संभाजीला समजू शकेल आणि त्याला प्रेम देऊ शकेल ती व्यक्ती म्हणजे येसूबाई याची महाराजांना खात्री वाटत होती. या बाबतीत महाराजांच्या कर्नाटक स्वारीचे उदाहरण ठळक आहे. त्यावेळी महाराजांनी विचारपूर्वक व धूर्तपणे संभाजीला शृंगारपूराजवळील प्रभावळीचा कारभार पाहण्यास सांगितले आणि त्याला रायगडावरील राजकारणापासून समंजसपणे दूर ठेवले. दुसरे म्हणजे शृंगारपूर हे येसूबाईंचे माहेर होते, तिथे तिचे वडिल पिलाजीराव शिर्के होते. त्याचा

आधार संभाजीला मिळेल हा हेतू त्यामागे होता.

संभाजीराजांच्या आयुष्यातील अतिशय दुर्दैवी घटना म्हणजे त्यांनी मोगलांना फितूर होणे ही होय. या बाबतीत तसेच मित्र कवी कलशाच्या प्रभावापासून येसूबाई संभाजीराजांना वाचवू शकली नाही आणि हे स्वराज्याचे दुर्दैव ठरले. संभाजी मोगलांकडून भ्रमनिरास होऊन परत आल्यावर त्याला महाराजांनी पन्हाळ्याच्या नजरकैदेत ठेवले होते. त्यावेळी येसूबाईंनाही संभाजीबरोबर रहायला सांगण्यात आले होते. खरं म्हणजे रायगडावर राजारामाच्या लग्नाचा सोहळा होता, पन्हाळ्याच्या आजूबाजूला मोगलांच्या हालचाली होत्या तरी त्यांनी येसूबाईंना तिथे ठेवले ते केवळ त्यांना येसूबाईंवर पूर्ण विश्वास वाटत होता म्हणून.

शिवाजी महाराजांच्या मृत्यूनंतर मोगलांनी ताबडतोब रायगडावर हल्ला केला. त्यावेळी अतिशय सूज्ञपणे आणि विचारपूर्वक असे निर्णय घेतले ते येसूबाईंनी. तिने प्रथम राजारामाला रायगडाबाहेर जायला लावले आणि त्याने बाहेरून प्रतिकार करावा असे सांगितले. रायगडावर शरण येताना व मोगलांबरोबर तह करताना तिने सन्मानाच्या अटी घातल्या. या तिच्या निर्णयावर महाराजांकडून तिने घेतलेल्या राज्यकारभारविषयक प्रशिक्षणाचा व त्यांच्या नीतिचा मोठा प्रभाव होता. एकूण शिवाजी महाराजांची सून म्हणून ती त्यांच्या विश्वासाला आपल्या कर्तृत्वाने पात्र ठरली असे म्हणायला हवे.

**ब. संभाजीराजांचा उदय ते त्यांचा क्रूर वध (१६८० ते १६८९)**

राजमाता जिजाई यांच्या मृत्यूनंतर पाचच वर्षात शिवाजी महाराजांचे आकस्मिक निधन झाले. हे दोन्ही धक्के रायगडावरील मुत्सद्दी मंडळींना हलवून गेले असतील यात नवल नव्हते. येसूबाई तर त्यांच्या कुटुंबातली आणि त्यात स्वराज्य शाबूत राखण्याची जबाबदारी त्यांच्या पतीवर आली होती. रायगडावर स्वार्थी

राजकारणाला ऊत आला. महाराजांच्या द्वितीय पत्नी सोयराबाईने राजारामाचे प्यादे पुढे केले आणि त्यात राज्याच्या अष्टप्रधानांमध्ये दोन तट पडले. त्यामुळे येसूबाईंना स्वराज्याची महाराणी म्हणून दोन आघाड्यांवर कसरत करावी लागली होती.

एक म्हणजे संभाजी हा शिवाजी महाराजांचा ज्येष्ठ पुत्र होता आणि त्याचाच हक्क डावलला जात होता. रागीट स्वभावाच्या संभाजी राजांना हे पसंत पडणे शक्य नव्हते. अशावेळी डोके शांत ठेवून त्यांना परिस्थितीची जाणीव करून देण्याबरोबर राज्यकारभाराची जबाबदारी लक्षात आणून देणे आवश्यक होते. दुसरे म्हणजे अष्टप्रधान मंडळ अनुभवी होते. कारभाराची त्यांना उत्तम जाण होती. त्यांची सहानुभूती मिळवून राज्यकारभाराची तयारी करणेही महत्त्वाचे होते.

या दोन आघाड्यांबरोबर तिसरे एक संकट त्यावेळी महाराष्ट्रावर पर्यायाने स्वराज्यावर आले होते आणि ते होते मोगल बादशहा औरंगजेबाच्या रूपाने. १६८० नंतर बादशहा मोठ्या सेन्यानिशी महाराजांच्या हिंदवी स्वराज्यावर चाल करून आला. अशाप्रकारे तीन आघाड्यांचा येसूबाईला सामना करावा लागला. तिने आपल्या माहेरच्या मंडळींना तसेच सोयराबाई, छोटा राजाराम यांना संरक्षण दिले आणि स्वराज्यात जुन्या जाणत्या अनुभवी मंडळींची अधिकारी म्हणून नेमणूक केली. खंडोबल्लाळ, निळो बल्लाळ सारख्या माणसांना तिने जवळ करून स्वराज्यासाठी त्यांचा फायदा करून घेतला. यातून येसूबाईंच्या मनाचा मोठेपणा व समयसूचकता दिसून येते.

संभाजी राजे ज्यावेळी मोहिमेवर राज्याच्या बाहेर असत. त्यावेळी राज्याचा कारभार येसूबाईंच्या ताब्यात असे. संभाजी राजांच्या अनुपस्थित राज्यात अनेक कामे असत. संपूर्ण राज्यात काय चालू आहे, त्यावर लक्ष देणे, गुन्हेगाऱ्यांवर नियंत्रण ठेवणे, कैदेत असणाऱ्यांवर नजर ठेवणे आणि राज्यात रयतेच्या कल्याणासाठी

सुव्यवस्था व शांतता राखणे अशी अनेक कामे त्यात असत. फितुरीसारखे प्रकार घडू नयेत यासाठी दक्ष असण्याची निकड त्यात असे. शिवाजी महाराजांच्या अनुपस्थित जिजाबाई हे काम करीत असायच्या. असेच काम येसूबाईंना संभाजी राजांच्या अनुपस्थित करावे लागत होते. या कामासाठी महाराजांनी जिजामातांना जसा स्वतःचा शिक्का दिला होता. त्याच धर्तीवर येसूबाईंना संभाजी राजांनी 'श्री सखी राज्ञी जयति' हा शिक्का दिला होता.

महाराणी येसूबाईंनाही ही कामे अतिशय जाणकारीने, सूज्ञपणे केली. त्यामुळे औरंगजेबाविरुद्ध त्यावेळी स्वराज्यात प्रचंड् शक्ती निर्माण होऊ शकली.

स्वराज्यातील रयतेला आणि देव देवतांना इजा पोचू नये हे राजाचं काम आहे हे आपले सासरे शिवाजी महाराजंच्या कारभारातून ती शिकली होती. त्यासाठी  तिने काढलेली अभय पत्रे उपलब्ध आहेत. चाफळच्या यात्रेसंबंधात तिने काढलेले एक पत्र प्रसिद्ध आहे तसेच संभाजी आणि येसूबाई यांनी पाचाडला राजमंदिर बांधण्याचा निर्णय घेऊन ते पूर्ण केले. त्यासंबंधातलेही पत्र आहे. शिवाय तुळजापूरच्या देवीस वार्षिक नेमणूक करून दिल्याचे पत्र संस्कृत भाषेत आहे. त्यावर संभाजी राजांच्याबरोबर येसूबाईंची मुद्रा विराजमान आहे. या बाबींमधून तिच्या सुविद्य स्वभावाची कल्पना करता येते.

संभाजू राजे शूर, लढवय्ये होते. परंतु स्वभावाने रागीट होते. त्यांच्या मित्रपरिवाराची निवड योग्य नव्हती. त्यामुळे कवी कलशासारख्या माणसाला त्यांनी जवळ केले, त्याच्या अनुष्टाने सारख्या प्रकारांना त्यांनी पायबंद घातला नाही. मात्र संभाजी राजे येसूबाईंचा अनादर करीत नव्हते. ती त्यांना कवी कलशापासून दूर करू शकली नाही. पण त्यांची अनुष्टाने रायगडावर करण्यास तिने बंदी घातली होती आणि ती ते इतर ठिकाणी करीत होते. संभाजी राजे येसूबाईची

प्रत्येक आज्ञा पाळत होते असे म्हणता येत नाही. मात्र त्याला काही प्रमाणात वचक बसला कारण कधी कठोर वागून कधी प्रेमाने समजावून ती त्यातून सुवर्णमध्य साधत होती आणि राज्यकारभाराची घडी विस्कटणार नाही हे पाहत होती. संभाजी राजांच्या संदर्भात येसूबाईंची ही कामगिरी दुर्लक्षित करता येणारी नाही.

**क. संभाजीराजांचा क्रूर वध ते येसूबाईंची मोगलाकडून कैद (मार्च १६८९ ते ऑक्टोबर १६८९)**

संभाजी राजांच्या निघृण हत्येनंतर येसूबाईंच्या मनावर खोल जखम झाली. ऐन तारुण्यात त्यांना वैधव्य प्राप्त झाले. अशा स्थितीत मोगलाची सेना स्वराज्याची राजधानी रायगडावर चाल करून आली. तिथं वेढा पडला. अशा या भीषण परिस्थितीत एखादी सर्वसाधारण स्त्री असती तर ती हातपाय गाळून बसली असती. पण येसूबाईंनी ज्या धीराने आपला तोल सांभाळला त्या धैर्याला तोड नाही. एवढ्या कठीण परिस्थितीत तिने स्वराज्याच्या हितासाठी जो दूरदर्शीपणाचा विचार केला त्याला उपमा नाही.

शिवाजी महाराजांनी परिश्रम घेऊन जे स्वराज्य स्थापन केले होते त्याचे रक्षण करणे हे ध्येय तिच्या डोळ्यासमोर होते. म्हणून तिने आपले डोंगरा एवढे दुःख गिळून राज्यातील सर्व मुत्सद्दी, योद्धे, प्रधान मंडळी यांना रायगडावर मसलतीसाठी बोलावले. भोसले घराण्याचे दोन्ही वारस म्हणजे राजाराम व शाहू हे एकत्र मोगलांच्या हाती सापडले तर मराठी राज्य नष्ट होण्यास वेळ लागणार नाही हे तिने चाणाक्षपणे जाणले आणि राजारामास रायगड सोडून ताबडतोब जिंजीस जाण्यास सांगितले. रायगडाबाहेरून राजारामाने शत्रूशी सामना करावा आणि रायगडाच्या संरक्षणासाठी तिने लढायचे ठरवले.

एखादी स्वार्थी, मतलबी स्त्री असती तर तिने आपल्या मुलाला गादीवर बसवण्याचा हट्ट केला असता. पण येसूबाईने स्वराज्याची

काळजी प्रथम पाहिली आणि त्यासाठी जीवाची पर्वा न करता आपल्या छोट्या मुलासह रायगडावर राहण्याचा निर्णय घेतला. तिने छत्रपतींच्या सर्व वारसदारांसह मोगलांना शरण जाण्याचा निर्णय त्यावेळी घेतला असता तर मराठेशाहीचा त्याच क्षणी अंत झाला असता. मराठेशाही वाचली आणि पुढे पेशव्यांच्या कारकीर्दीत ती भरभराटीस आली त्याचे श्रेय निश्चितपणे येसूबाईंच्या या दूरदृष्टीच्या निर्णयाला जाते.

राजारामाला तिने जिंजीकडे पाठवले आणि ते स्थिरस्थावर होईपर्यंत येसूबाई इतर मुत्सद्दांच्या व सरदारांच्या साथीने रायगडाचे संरक्षण करीत राहिली. जवळपास नऊ महिने तिने रायगड शर्थीने लढविला. इथेही तिने मोठा धूर्तपणा दाखवला. गड लढवणे अशक्य होत आहे हे लक्षात येताच तिने सर्वनाश होण्याचा धोका टाळला आणि आत्मसमर्पणाचा कठोर निर्णय गेतला. हा निर्णय घेताना तिच्यापुढे शिवाजी महाराजांचाच आदर्श होता. तो होता महाराजांनी केलेला पुरंदरचा तह. रायगडावर असलेल्या सर्व अधिकाऱ्यांना तिने आपली कल्पना समजावून सांगितली. सर्वांना क्रूर औरंगजेबाच्या धोक्याची पूर्ण जाणीव करून दिली. हा तह करताना तिने गडावर चाल करून आलेल्या मोगल सरदार झुल्फिकारखान व बेगमेकडून स्वतःची, पुत्र शाहूची आणि कुटुंबाच्या संरक्षणाची हमी घेऊन आत्मसमर्पणाला मान्यता दिली.

राजाराम आणि इतर मंडळी आपणास निराधार करून गेली आहेत अशी बतावणी करून येसूबाईंनी मोगलांचा आश्रय घेतला. मोगलांना बावीस किल्ल्यांच्या सोडचिठ्ठ्या लिहून दिल्या. त्यामधूनही तिच्या धूर्तपणाचे दर्शन घडते.

येसूबाईंच्या सूज्ञ सल्ल्यामुळे राजाराम महाराज हिंदवी स्वराज्य पुन्हा निर्माण करू शकले. त्यामुळे येसूबाईंची रायगडावरील ही मसलत इतिहासातील खूप महत्त्वाची ठरते यात वाद नाही.

**ड. येसूबाईंचे कैदेतील दिवस ते कैदेतून सुटका (ऑक्टोबर १६८९ ते १७१९) –**

स्वराज्य सुस्थितीत रहावे यासाठी येसूबाईने अतिशय सूज्ञपणे औरंगजेबाच्या सरदारापुढे समर्पण स्वीकारले आणि जवळपास तीस वर्षे मोगलांच्या कैदेत अतिशय वाईट स्थितीत काढली. दुःखाच्या दिवसात औरंगजेबाच्या छावणीत असताना तिच्यावर व कुटुंबावर उपासमारीची पाळी आली. मात्र यातूनही ती तावून सुखावून बाहेर आली. कारण सुख-दुःखाची फिकीर करण्यास तिला वेळ नव्हता. तिचे सगळे लक्ष हिंदवी स्वराज्याकडे व त्याच्या संरक्षणाकडे लागलेले होते.

मोगलांच्या कैदेच्या कालखंडात तिचा गुप्त हेरांमार्फत राजाराम महाराजांशी संबंध होता. बऱ्याचवेळा पत्रांमधून ती त्याला राजकारभारविषयक सूचना व मसलती दिल्याचे इतिहासातील दाखल्यांमधून दिसून आले आहे. मात्र हे करताना मोगल बादशहाला याचा सुगावा लागू देता कामा नये याची खबरदारी घ्यावी लागत असायची.

औरंगजेबाच्या कैदेत असताना शाहूचा विवाह प्रतिष्ठित मराठा घराण्यातील दोन वधूंशी लावण्यात आला होता. शाहूच्या वधूला बघण्याची इच्छा बादशहाने एकदा प्रदर्शित केली तेव्हा मोठ्या चतुराईने येसूबाईने झीनत बेगमचे मन वळवले आणि विरूबाई नावाच्या दासीला शाहूची वधू म्हणून पाठवले. या प्रसंगामधून तिचे मराठी परंपरा जतन करणारे मन दिसून येते. तिचे मोगल बादशहासी असलेले वर्तनही खूप समंजसपणाचे होते आणि तिने पुत्र शाहूलाही शालीनता राखण्याचे शिक्षण दिले होते. त्यामुळे बादशहाने शाहूवर खूष होऊन त्याला सात हजारी मनसब दिली, मात्र त्या मनसबीचा कारभाराचा अधिकार येसूबाईंकडे सुपूर्द केला होता.

औरंगजेबाच्या मृत्यूनंतर मोगलांमध्ये बेदिली माजली आणि त्यांना शाहूची सुटका करावी लागली. येसूबाई व इतर कुटुंबिय यांना ओलीस म्हणून दिल्लीला नेण्यात आले. इकडे महाराष्ट्रात ताराबाईने तिच्या मुलाच्या नावाने कारभार सुरू केला होता तर राजारामाच्या दुसऱ्या पत्नीने कोल्हापूरला दुसरी गादी स्थापन केली होती. राज्याचे तुकडे पाहण्याचे दिवस येसूबाईंवर आले, तरी तिने संयम ढळू दिला नाही.

सुटकेनंतर मुलगा शाहूच्या राज्यात समाधानाने येसूबाई परत आल्या आणि रयतेच्या हिताचे सल्ले आणि न्यायनिवाडे दिले.

येसूबाईंनी आपल्या सोज्ज्वळ आणि सात्विक वागणुकीने औरंगजेबा-सारख्या क्रूर शत्रूच्या राज्यातही स्वतःचे स्वत्व निर्मळ राखले.


येसूबाईंचे वेगळेपण मान्य करताना असे म्हणावेसे वाटते की, तिच्या वैयक्तिक आयुष्यात एखाद्या सामान्य स्त्रीसारखेच चढउतार आले आणि तिने ते सोसले. मात्र येसूबाईचे वैशिष्ट्य असे की, तिने आपल्या सांसारिक अपत्तींची सांगड मराठी राज्याबरोबर जोडली नाही. उलट मराठी राज्याच्या संरक्षणासाठी आणि उत्कर्षसाठी स्वतःचे वैयक्तिक मानमरातब, स्वार्थ बाजूला ठेवून स्वतःच्या सुखाला तिलांजली दिली.


येसूबाईने हातात तलवार घेऊन रणांगण गाजवले नाही त्यामुळे इतिहासात तिचे व्हावे तेवढे नाव, कौतुक झाले नाही, तिला प्रसिद्धी मिळाली नाही परंतु आपल्या मुत्सद्देगिरीने, धीरोदत्त, निःस्वार्थी वागणुकीने तिने मराठी राज्याची शकले होऊ दिली नाहीत. मराठी राज्य एकसंघी, स्वयंपूर्ण बनविण्यास मदत केली हे तिचे योगदान कुणालाही नाकारता येणार नाही.

■

## ई साहित्यवर श्री अशोक बेंडखळे यांची या पूर्वीची पुस्तके






अशोक बेंडखळे

राजमाता जिजाई या शिवाजी राजांच्या माता, त्यांच्या मनात स्वराज्याचा अंकुर रूजवणाऱ्या आणि त्यांना हिंदवी राज्याची प्रेरणा देणाऱ्या. जिजाईंना बालपणी मराठी सरदार परकीयांची वेठबिगारी करतायेत हे आपल्या बंधुंकडून कळले आणि त्यांच्या मनात स्वराज्याचा विचार पक्का झाला. त्यांनी राजांवर उत्तम संस्कार केले. मर्दानी कलांमध्ये पारंगत केले. पुण्याचा कारभार पाहताना शिवबांना कारभाराची तंत्र-मंत्र शिकवली. शिवाजी राजे मोहिमांवर जात तेव्हा जिजामाता कारभाराकडे लक्ष देत. राजांचा राज्याभिषेक झाला आणि आपला पराक्रमी पुत्र लोकांचा राजा झाला हे पाहून त्या कृतार्थ झाल्या. एक माता मनात आणले तर काय करू शकते त्याचे जिजामाता हे ज्वलंत उदाहरण आहे.